गुरुवार, १४ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १२३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 14 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-123 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05


HAPPY 2024 NEW YEAR

# नवे वर्ष...! नव्या कविता...!

# कोण होणार महाराष्ट्राचा महाकवी ?

आधुनिक केसरी आयोजित

## राज्यस्तरीय युट्यूब काव्यवाचन स्पर्धा


### अशा पाठवा कविता

कवींनी सुरुवातीला आपला परिचय व नंतर स्वतःची कविता असा व्हिडिओ (जो की 5 मिनिटांच्या कमी व 10 मिनिटांच्यावर नसेल) 7620838883 या नंबरवर पाठवावी.

कवितेचा व्हिडिओ पाठविण्याची अंतिम तारीख 31 डिसेंबर 2023 असेल.

YouTube


जनता जनार्धन करणार महाकवीची निवड, सर्व कवींच्या कविता आधुनिक केसरीच्या युट्यूब चॅनलवर प्रसारित होतील. ज्या कवितेला जास्त लाईक येतील तेच होतील महाकवी!





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्यांचीही उपस्थिती आनंददायी होती. सगळ्यांचीच नावे घेणे शक्य नाही. पण या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य हे जाणवले की आयोजकांनी आलेल्या प्रत्येकाची दखल घेतली, सन्मान केला. महाराष्ट्र मित्र या व्हाट्सअप समूहाचे पण दोन वेळा असेच सुदर असे गेट टुगेदर पुण्यात दोन वेळा झाले. त्यातही अनेक नामवंत साहित्यिकांचा समावेश आहे. प्रशांतजी गौतम यांनी मोठ्या कौशल्याने आणि प्रेमाने सगळ्यांनी एकत्र बांधून ठेवले आहे. मनमंदिर हा असाच एक ग्रुप. विभाताई देशपांडे, गिरीशजी वसेकर आणि त्यांचे सहकारी ही या ग्रुपला बांधून ठेवणारी मंडळी. या गृपनेही पुण्यात दोन वेळा एक दिवशीय कार्यक्रमाचे सुंदर आयोजन करून सगळ्यांच्या गाठीभेटी घडवून आणला. प्रत्यक्ष सादरीकरणाला वाव दिला. माझा उगवतीचे रंग हाही असाच एक समूह. पुण्यात गेल्यावर या ग्रुपमधील सदस्यही भेटत असतात. कुठल्या तरी निमित्ताने आम्ही एकत्र येतो, एकमेकांना भेटतो, विचारांची देवाणघेवाण होते. आम्हां वर्गमित्रांचा फ्रेंड्स फॉरेव्हर हा ग्रुप असेच एकत्र येऊन एकमेकांच्या भेटी घेतो, कार्यक्रमांचे आयोजन करतो. चाळीसगावच्या बागेतील जॉगिंग करणाऱ्या मंडळींचा देखील असा समूह आहे. हे असे कार्यक्रम आयोजित करणारे समूह म्हणजे आजच्या आभासी जगातील हिरवळच म्हटली पाहिजे. ही सगळी मंडळी एकत्र येऊन केवळ मनोरंजनाचे कार्यक्रमच आयोजित करीत नाहीत तर मराठी आणि एकूणच भारतीय संस्कृतीच्या वाढीला हातभार लावतात. काही समूहांच्या कार्यक्रमांमुळे नकळत वाचन संस्कृतीला हातभार लावला जातो. नवीन कवी, लेखकांना मार्गदर्शन, प्रेरणा मिळते. समविचारी मंडळी एकत्र आल्याने अनेक चांगल्या विधायक गोष्टी घडून येतात. चांगल्या विचारांचा जागर होतो. आजच्या धावपळीच्या काळात प्रत्येकजण आपल्या कामात हरवून गेला आहे. पण त्यातून असे चारदोन दिवस वेळ काढून एकत्र येता येते. रोजच्या दगदगीच्या जीवनातून काही काळ का होईना पण विसाव्याचे आणि आनंदाचे क्षण मिळतात. आपले विचार मांडता येतात, मन मोकळे करता येते आणि अशा कार्यक्रमातून रिचार्ज होऊन पुन्हा आपण नवीन उत्साहाने आपल्या दैनंदिन जीवनाकडे वळू शकतो हीच या अशा कार्यक्रमांची फलश्रुती म्हणावी लागेल.



# आनंदी पहाट

## शाश्वत विकासासाठी शिक्षण महत्वाचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शाश्वत विकासासाठी आणि भविष्यासाठी शिक्षण प्रत्येक मनुष्याला आवश्यक ज्ञान, कौशल्ये, दृष्टिकोन आणि मूल्ये प्राप्त करण्यास अनुमती देते. शाश्वत विकासासाठी शिक्षण म्हणजे अध्यापन आणि शिक्षणामध्ये शाश्वत विकासाच्या प्रमुख मुद्द्यांचा समावेश करणे; उदाहरणार्थ, हवामान बदल, आपत्ती जोखीम कमी करणे, जैवविविधता, गरिबी कमी करणे आणि शाश्वत उपभोग घेणे होय. यासाठी अध्यापन आणि शिकण्याच्या पद्धती देखील आवश्यक आहेत, ज्या विद्यार्थ्यांना त्यांचे वर्तन बदलण्यासाठी आणि शाश्वत विकासासाठी कृती करण्यास प्रेरित तसेच सक्षम करतात. शाश्वत विकासासाठी शिक्षण परिणामी गंभीर विचार करणे, भविष्यातील परिस्थितीची कल्पना करणे आणि सहयोगी मार्गाने निर्णय घेणे यासारख्या क्षमतांना प्रोत्साहन देते. शाश्वत विकासासाठी, शिक्षणासाठी आज ज्या पद्धतीने शिक्षणाचा सराव केला जातो, त्यामध्ये दूरगामी बदल आवश्यक आहेत. शाश्वत शिक्षणासाठी कोणतेही योग्य अध्यापनशास्त्र नाही, परंतु त्यासाठी सक्रिय, सहभागी आणि प्रायोगिक शिक्षण पद्धतींकडे वळणे आवश्यक आहे; जे शिकणाऱ्याला गुंतवून ठेवतात आणि त्यांच्या समज, विचार आणि कृती करण्याच्या क्षमतेमध्ये वास्तविक फरक करतात. अधिक शाश्वत जग साध्य करण्यासाठी दर्जेदार शिक्षण हे एक आवश्यक साधन आहे. जागतिकीकरण आणि डिजिटलायझेशन जगाला जोडतात. परिणामी, संस्कृती मिसळतात, अर्थव्यवस्था वाढतात आणि संवादाचा वेग वाढतो. जग अधिकाधिक गुंतागुंतीचे आणि अनिश्चित होत आहे. मानवता ग्रहाचे हवामान, प्राणी आणि एकूणच चित्र बदलत आहे. पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीला धोका निर्माण करत आहे. शाश्वत विकासासाठी विद्यार्थ्यांना जागतिक नागरिक म्हणून शिक्षित करण्याच्या उद्देशाने शाश्वत शिक्षण हा पर्यायी दृष्टीकोन प्रदान करते. ह्यामध्ये लोकसंख्या, प्राणी आणि वनस्पती प्रजाती, परिसंस्था, नैसर्गिक संसाधने यांचा समावेश होतो आणि गरिबीविरुद्ध लढा, लैंगिक समानता आणि मानव, प्राणी यांचे हक्क पाळल्या जाणाऱ्या समस्यांना एकत्रित करते.



आधुनिक केसरी

## संसार नेटका | होतो जाण ||

संसार पसारा | आवरावा कैसा ||
आशेचा वळसा | घात करी ||१||
सुटता सुटेना | विकारांची गाठ ||
दुःख काही पाठ | सोडियना ||२||
असंगाशी संग | नेमका घडतो ||
म्हणूनी नडतो | संसार हा ||३||
पूर्व पुण्याईने | सापडते वाट ||
ओळखावा घाट | प्रारब्धाचा ||४||
सोड पाश सारे | होईल सुटका ||
संसार नेटका | होतो जाण ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

कांहीं वैभव मेळविलें ।पुन्हां सर्वही संचिलें ।
परंतु गृह बुडालें ।संतान नाहीं ॥३१॥
पुत्र संताअन नस्तां दुःखी ।वांज नांव पडिलें लोकिकीं ।
तें न फिटे म्हणोनी लेंकी ।तरी हो आतां ॥३२॥
म्हणोन नाना सायास ।बहुत देवास केले नवस ।
तीर्थें व्रतें उपवास ।धरणें पारणें मांडिलें ॥३३॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

उत्तम सत्य करतब्य है, सेवा सद्गुरु देव ।
ब्रह्मविद्या मिल मधुकशा, गुरुडम्ब नहिं
गुरु सेव ।।२८।।(स्वर्वेद पंचम मण्डल
पंचम अध्याय) ०५/०५/२८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जीवनातील उत्तम सत्य कर्तव्य
सद्गुरूंची सेवा आहे. त्यांच्या ब्रह्मविद्या
तत्त्वज्ञान योगा-साधनेद्वारे परम अक्षर,
सारशब्दाची प्राप्ती होते. म्हणून सर्व
तत्त्वद्रष्टा महर्षि सद्गुरुंची सेवा अंध
गुरूभक्ती नाहीये.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ५६वे

रामनामाने होते शुद्धि चित्ताची । घ्या, रामनाम
सदा, गोष्ट ही हिताची । स्वामींना सांगती
श्रीमहाराज ।। १ ।।
नाम सामर्थ्य जाणूनी घेती । रामनामाची दीक्षा
घेती । दीक्षा देण्याचा अधिकार स्वामींना देती ।
श्रीमहाराज ।।२ ।।
शांताश्रमस्वामी काशीमधले । श्रीमहाराजाना
येऊन भेटले ।
दोघे बरोबर राहू लागले । काशी वास्तव्यात
।। ३ ।। बारा वर्षे मौन धारण केले । तेरा
कोटी रामनाम" संकल्प ते पूर्ण केले । याच
शांताश्रमस्वामींनी ।।४ ।।
रसाळ भजन स्वामींचे ऐकता। साक्षात
राममूर्ती दिसे डोलता। आनंद मिळे सर्व भक्ता।
घेता रामनाम ।। ५ ।स्वामींना ।। ६ ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# प्रपंचातले सुख-दु:ख हे केवळ जाणिवेत आहे

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? 'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो



तरी आपल्याला समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.

**८७. वासना म्हणजे देवाच्या विरूद्ध असलेली आपली इच्छा.**

# गुणरूप

आधुनिक केसरी



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

वासनेच्या ताब्यातून सुटून स्वस्वरूपासारखे विशाल होण्यास आपली वृत्ति विशाल करावी. ही तर समर्थांची शिकवण आहे. ज्ञानाच्या म्हणजे जाणते पणाच्या सामर्थ्यावर फार विश्वास आहे. माणसाने समजून उमजून गुणांमध्ये वाढ केली तर; गुणसंपन्न झाले तर भाग्य त्याच्या मागे आपोआप धावेल.पण होते काय जन्माला आलेला जीव अवगउणआंत ऐवढा गुरफटून जातो की दुर्गुणांच्या अति वापरामुळे त्यास करंटेपणा भोगावा लागतो. परमार्थाचा संबंध माणसाच्या अंतरंगाशी असतो. त्यामध्ये वृत्ति सुधारावी लागते. वासना क्षीण करावी लागते.आधी मनापासून वृत्ति तयार करावी नंतर सर्वांपासून अलिप्त राहून म्हणजेच विचारपूर्वक वागून परमार्थाचा मार्ग अवलंबावा. हे सर्व करू सुध्दा मी कोणीच नाही मी पणाचा त्याग करून कशातही न अडकणारा जीव तो धन्य होय. त्यासाठी आपण देखील ज्ञानवंत होणे गरजेचे नाही का?

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १४ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



## महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना करा : पटोले

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** राज्यात आज विविध समाज आरक्षणासाठी आंदोलन करत आहेत. मराठा, धनगर, हलबा, गोवारी, ओबीसी समाज आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरला, हे बीज कोणी रोवले? भाजपाने सत्तेत येण्यासाठी २०१४ मध्ये या समाज घटकांना आरक्षणाचे आश्वासन दिले होते मग सत्ता आल्यानंतर आरक्षण देण्यापासून तुम्हाला कोणी थांबवले आहे का? आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराजांच्या भूमीतच आरक्षणावरून वाद होत आहेत हे भूषणावह नाही. या सर्वांवर एकच पर्याय असून सत्ताधारी पक्षाकडे स्पष्ट बहुमत आहे, सरकारने जातनिहाय जनगणना करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

विधानसभेतील चर्चेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, २०१८ मध्ये मोदी सरकारने राज्याचे आरक्षणाचे अधिकार काढून घेतले पण २०१९ मध्ये तत्कालीन फडणवीस सरकारने विधानसभेत मराठा आरक्षणाचे विधेयक आणून ते एकमताने मंजूर करण्यात आले, त्यावेळी गायकवाड आयोग नेमला होता पण सुप्रीम कोर्टात आरक्षण टिकले नाही, सुप्रीम कोर्टाने गायकवाड आयोगावरही ताशेरे ओढले. त्यावेळचे सॉलिसिटर जनरल मराठा आरक्षणावर बाजू मांडण्यासंदर्भात काय म्हणाले होते हे सर्वांना माहित आहे. मराठा आरक्षणाविरोधात कोर्टात कोण गेले होते? त्यांच्या पाठीमागे कोण लोक आहेत? हे जनतेला समजले पाहिजे. आरक्षणावरून जाती-जातीत वादाचा वणवा कुणी लावला? भाजपा आता गरिबी ही जात आहे असे म्हणत आहेत, गरिबी जात होऊ शकत नाही यातून गरिब व श्रीमंत अशी दरी निर्माण करु नका. आरक्षणाच्या प्रश्नावर रस्त्यावर लढाई सुरु आहे. आरक्षणाची चर्चा रस्त्यावर न होता सरकारने ओबीसी व मराठा समाजातील लोकांना बोलावून चर्चा केली पाहिजे. महाराष्ट्र पेटता ठेवणे बरोबर नाही. महाराष्ट्रात शांतता नांदली पाहिजे. राज्यात आज अस्थिरता असल्याने त्याचा परिणाम उद्योगांवर होत आहे, राज्यातील एक-एक उद्योग बाहेर जात आहेत, मोठे उद्योग तर आधीच गुजरातला देऊन टाकले आहेत. राज्यात उद्योग आले नाहीत तर नोकरी, रोजगार कसे मिळतील. आरक्षणाच्या प्रश्नावर मंत्रिमंडळातच एकमत नाही, मंत्रीच वेगवेगळी भूमिका मांडत आहेत. काँग्रेस पक्षाची आरक्षणावर स्पष्ट भूमिका आहे, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक मागास समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे पण कोणी आम्हीच आरक्षण आणतोय असे समजण्याचेही कारण नाही. मराठा आरक्षणासाठी सुरु असलेल्या जरांगे-पाटील यांच्या आंदोलनावर पोलीस लाठीचार्ज केला गेला त्यानंतर आंदोलन चिघळले. मराठा-ओबीसी समाजात कोणी वाद निर्माण केला त्याचे उत्तर दिले पाहिजे. आज दोन समाजात अंतर निर्माण झाले आहे ते कोण भरुन काढणार? असा सवालही नाना पटोले यांनी विचारला.



# सरकारला सद्बुद्धी द्यावी

## शंकराचार्यांचे जेजुरीच्या खंडोबा साकडे

आधुनिक केसरी न्यूज

**विजयकुमार हरिश्चंद्रे**

**जेजुरी : सरकारने 1996 पासून जी.आर. काढला आहे. या सरकारला सद्बुद्धी मिळावी. न्यायालयीन ऑर्डरचे पालन करावे, कोणत्याही ट्रस्टच्या प्रॉपर्टीला कुळाची नावे लावू नयेत, असे असतानाही कुळाची नावे लावली जातात. तलाठी, मंडळ अधिकारी यात काहीतरी घोटाळा करत आहेत, याबाबत कमिशनर यांनी नाराजीचे पत्रही दिले आहे. तरी देखील हा प्रकार चालू असल्याचे सांगत करवीर पिठाचे शंकराचार्य यांनी सरकारवर गंभीर आरोप केले.**

जेजुरीत लोकदैवत खंडोबाच्या घटस्थापना कार्यक्रमासाठी करवीर पिठाचे शंकराचार्य उपस्थित होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बुधवारी श्री खंडोबा देवाचा चंपाषष्ठी उत्सव जेजुरी गडावर साजरा झाला. मुख्य गाभाऱ्यातील स्वच्छता, पाखळणी उरकल्यानंतर मुख्य उत्सव मूर्ती बालद्वारीमध्ये स्थापना करण्याकरिता नेण्यात आल्या. पुजारी, सेवेकरी वर्गाकडून सालाबादप्रमाणे घटस्थापना प. पू. आद्य श्री नृसिंह भारती शंकराचार्य, करवीरपीठ कोल्हापूर यांच्या शुभहस्ते साडेबारा वाजता करण्यात आली. यावेळी पुजारी, सेवेकरीवर्ग, श्री मार्तंडदेव संस्थान विश्वस्त मंडळ, वेदमूर्ती पुरोहित शशिकांत सेवेकरी काका, मंगेश खाडे गुरुजी यांच्या मंत्रोच्चाराच्या व सनई चौघडाच्या वादनात विधिवत पूजा, अभिषेक करून उत्सव मूर्ती घटस्थापनेच्या ठिकाणी बसविण्यात आल्या. या प्रसंगी जेजुरी देवस्थान मानकरी सचिन पेशवे, श्री मार्तंड देवसंस्थांचे प्रमुख विश्वस्त पोपटराव खोमणे, विश्वस्त मंगेश घोणे, ॲड. पांडुरंग थोरवे, ॲड. विश्वास पानसे, डॉ. राजेंद्र खेडेकर, अनिल सौंदडे, अभिजीत देवकाते तसेच पुजारी, सेवेकरी गणेश आगलावे, अविनाश सातभाई, प्रशांत सातभाई, बाळासाहेब दीडभाई, देवल बारभाई, मल्हार बारभाई, धनंजय आगलावे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आल्या.



**बुधवारपासून खंडोबाच्या नवरात्र उत्सवाची सुरुवात झाली. छत्रपती संभाजीनगरच्या सातारा येथील खंडोबाची केलेली आकर्षक पूजा !!**
**छायाचित्र : सुधीर कोर्टीकर**

# दादा! तुम्ही अगदी बरोबर बोललात...

आधुनिक केसरी न्यूज



शाम हेडाऊ
9834301568

दादा काय आहे ना, राजकारणात यायला पदव्यांची अट नाही, ना शिक्षणाची. त्यामुळेच म इथे अंगठा छापसुद्धा मंत्री होतो आणि राबडीदेवी मुख्यमंत्री. शिक्षणाचं काय हो! तुमच्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रातील गुंतवणूक म्हणजे "डेड इन्व्हेस्टमेंट". हो, कारण त्यातून लगेच रिटर्न मिळत नाही ना. त्यापेक्षा सिंचन क्षेत्र बरं... पाणी मुरण्यासाठी हो! संशोधनाचं काय? पायलीचे पन्नास करतच असतात की. करावं ज्याच त्यांनी. त्यांना कशाला शिष्यवृत्त्या हव्यात? हं आता मंत्र्यांचा अभ्यास दौरा, आमदारांचा अभ्यास दौरा हा तसा अत्यंत महत्वाचा. त्यामुळे यावर शासनाने खर्च करायलाच हवा. शेवटी मंत्री, आमदार हे यातून अभ्यास करतात, संशोधन करतात आणि या संशोधनातूच मग जेव्हा धरणात पाणी रहात नाही तेव्हा तुमच्या लघुशंकेने (सॉरी सॉरी, तुमचा शब्द मुतल्याने असा होता.) शेतकऱ्यांना शेती सिंचनाला मदतच होते. त्यामुळेच तर अभ्यास दौरे महत्वाचे. केवढा मोठा हा शोध तुम्ही लावलेला! खरंतर ना हे संशोधन करणारे विद्यार्थी ना मूर्ख आहेत. काय दिवे लावायचे आहेत यांना आणि काय फायदा यांच्या संशोधनाचा? ते मंगळावर वगैरे जायचं किंवा ते रोव्हर उतरवणे वगैरे फालतूची कामं आहेत. खरंतर ना हे पीएच.डी. पदवी रद्द करायला हवी महाराष्ट्र शासनाने. यावर विद्यापीठाच्या माध्यमातून विनाकारण खर्च होतोय. त्यापेक्षा लोक झोपलेले असताना पहाटे पहाटे करायच्या शपथविधीच्या कार्यक्रमावर योग्य तो खर्च व्हायलाच हवा. आणि हो, ते घटनेत असो नसो... दोन दोन उपमुख्यमंत्री हे झालेच पाहिजेत. म्हणजे काय न सगळ्या सोईसुविधा कशा आवश्यक म्हणून मिळायला लागतात. काय ना, अजितदादा तुम्हाला लोकांनी निवडून दिलंय. त्यामुळे या लोकांकडून तुम्हाला खूप धोका आहे बरं. बरं झालं ते सर्व आमदारांना आपण ताफ्यासह सुरक्षा दिली आहे. त्यांच्या मागे पुढे एक इन्स्पेक्टर, बंदूकधारी नि बाकीचा ताफा यावर होणारा नाममात्र खर्च शासनाने करायलाच हवा. ज्या लोकांनी तुम्हाला निवडून दिलं त्या लोकांकडून किती धोका असतो ना तुम्हाला. त्यामुळेच म हा खर्च आवश्यक. अत्यंत आवश्यक.

आता हे पीएच.डी. करणारे , संशोधन करणारे यांच्याकडे पैसा नाही तर कशाला करावं यांनी संशोधन? तुमच्याचकडे कितीतरी कामं आहेत मंडप टाकणे, खुर्च्या लावणे, उचलणे, सतरंज्या ऐवजी ग्रीन कार्पेट, रेड कार्पेट टाकणे, मध्यरात्री बॅनर बांधणे, शिवाय धरणे आहेत, रास्ता रोको आहेत, आंदोलन आहे, उपोषण आहे. ही सगळी इतकी महत्वाची कामं असतांना संशोधनात काय ठेवलंय हो? काय मिळणार आहे पीएच.डी. करून? कोणता झेंडा घेऊ हाती असं म्हणायची देर, बस सगळ्या पक्षांची दारं कार्यकर्त्यांसाठी उघडी आहेत. इथे यावं कामं करावीत. म तुम्ही तीन लाखांच्या खालचे कामाचे तुकडे देताच की तुमच्या मागेपुढे फिरणाऱ्या कार्यकर्त्यांना.



पाच लाख, दहा लाख अशी म वर्गवारीची कामं तुमच्या स्विय सहाय्यकाच्या सूचनेनुसार जातातच की कार्यकर्त्यांना या तुकड्यांवर (सॉरी, कामावर) जगावं ना तरुणांनी. असंही शेवटी पीएच.डी. केल्यावरही शेवटी तुमच्यापर्यंत पैसे पोहोचावेत म्हणून पन्नास पंचावन्न लाख रुपये द्यावे लागतातच की लेक्चररशीपसाठी. ते घेतल्याशिवाय थोडी न मंत्रालयातून परवानगी मिळते पदमान्यता, पदभरतीला! तेव्हा खरंतर हे पीएच. डी. वगैरे थोतांड आहे, फालतू आहे, वेळ आणि पैसा दोन्ही व्यर्थ खर्च होतात यावर. त्यामुळे तुम्ही जे बोलले ना अजित दादा ते अगदी बरोबर आहे. काय दिवे लावायचे आहेत यांना? आणि हे काय दिवे लावणार पीएच.डी. करून?

तरुण मित्र मैत्रिणींनो तुम्ही पण हे लक्षात घ्या की अजित पवार या महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री असणाऱ्या महोदयांनी या खुर्चीवर बसण्यासाठी त्यांच्या आयुष्यातील अनेक वर्षे झिजवली आहेत. त्यातूनच त्यांना प्रचंड अनुभव आलेला आहे आणि या अनुभवातूनच त्यांनी थेट विधानसभेतून तुम्हाला संदेश दिला आहे की, हे उच्च शिक्षण, संशोधन वगैरे करण्यात तुम्ही तुमच्या आयुष्याची मौल्यवान वर्षं वाया घालवू नका. त्यांच्या अनुभवातून आलेल्या शहाणपणातूनच ते धरणावर जाऊन जे काही करतात तेच तुम्ही आता विधानसभेवर जाऊन करा. यातूनच मग पुढे तुम्हीही कधीतरी आमदार, मंत्री, उपमुख्यमंत्री, असे मोठे नेते होऊ शकता. चला तर मग तरुण मित्र मैत्रीणींनो हे आपल्या अकलेचे दिवे लावणे बंद करा ... चला आपणही धरणावर जाऊया...

# अब्दुल्लांचे शाहांना उत्तर

आधुनिक केसरी

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात काश्मीरप्रश्नी अनेकवेळा चर्चा झाली. लोकसभा आणि राज्यसभेत झालेल्या चर्चेवेळी गृहमंत्री अमित शाह यांनी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर निशाणा साधला. अमित शाह म्हणाले, नेहरूंच्या चुकांमुळे काश्मीरला खूप काही भोगावं लागलं आहे. काश्मीर युद्धावेळी भारतीय सैन्य जिंकत होतं पण पंजाबचा भाग येताच नेहरूंनी युद्धबंदी केली. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरचा जन्म झाला. जो भाग आपल्याला परत कधीच मिळाला नाही. या युद्धाच्या सुरुवातीला नेहरू काश्मीरमध्ये सैन्य पाठवण्याचा निर्णय घेत नव्हते. सरदार वल्लभभाई पटेल यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर नेहरूंनी सैन्य पाठवले. दरम्यान अमित शाह यांच्या टीकेला नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारूख अब्दुल्ला यांनी उत्तर दिले आहे. अब्दुल्ला यांनी काही वेळापूर्वी एनडीटीव्हीशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, हे लोक (भाजपा) नेहमी जुने रडगाणे गात असतात. पंडित नेहरूंवर टीका करत असतात. ते म्हणतात पंडित नेहरूंनी ७० वर्षांमध्ये काहीच केले नाही. आज जे चांद्रयान आपण पाठवले त्याची सुरुवात कोणी केली? कोणी या सगळ्याचा पाया रचला? अणूऊर्जा कार्यक्रमाची सुरुवात कोणी केली? जवाहरलाल नेहरूंनी केली. फारूख अब्दुल्ला म्हणाले, नेहरूंच्या चुकांमुळे पाकव्याप्त काश्मीर आपल्या ताब्यात आला नाही, असं ते म्हणतायत. परंतु, हे असत्य आहे. तुम्ही एकदा सरदार वल्लभभाई पटेल यांचे पत्र पाहा. ते आजारी असताना देहरादून येथे होते. तेव्हा त्यांनी गोपाल स्वामी अयंगार यांच्यासाह काही लोकांना एक पत्र लिहिले होते. त्यात पटेल यांनी म्हटलं होतं की, जास्त काळ इथे टिकण्यासाठी आमच्याकडे संसाधने नाहीत. त्यामुळे आम्ही अधिक काळ ही लढाई चालू ठेवू शकत नाही. यासाठी आपण जवाहरलाल नेहरूंना जबाबदार ठरवू शकत नाही. जम्मू आणि काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे संविधानातील 'कलम ३७०' रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय घटनात्मकदृष्टया वैध असल्याचा निर्वाळा सोमवारी (११ डिसेंबर) सर्वोच्च न्यायालयाने दिला. याबाबतही अब्दुल्ला यांनी प्रतिक्रिया दिली. अब्दुल्ला म्हणाले, याच सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी यापूर्वी निकाल दिला होता की कलम ३७० कायमस्वरुपी आहे. पण आता ते रद्द झाले. ठीक आहे, बघू पुढे काय होते. विश्वासावर हे जग उभे आहे. हे दिवसही जातील. यांना कलम ३७० हटवण्यासाठी ७० वर्षे लागली. ते परत आणण्यासाठी कदाचित आम्हाला २०० वर्षे लागतील.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# लोकांना फक्त आरक्षण दिसते

आधुनिक केसरी

**राजकीय झोळी भरण्यासाठी कोणताही मुद्दा नसला की आरक्षणाचा मुद्दा तापवला जातो. आरक्षणाचा मुद्दा जेव्हा जेव्हा चर्चेसाठी येतो, जेव्हा जेव्हा आरक्षणासाठी लोक आंदोलन करतात तेव्हा आरक्षणाला चुकिचेच ठरवण्याचा प्रयत्न करून आरक्षणाला दोष देऊन आरक्षण मागितले जाते. आरक्षणामुळेच गुणवंत विद्यार्थ्यांना संधी मिळत नाही, आरक्षणाच्या लाभार्यांची लायकी नाही, आरक्षणामुळे कमकुवत लोक समोर जात आहेत आणि मजबूत लोक मागे राहत आहेत वगैरे वगैरे सिद्धांत मांडून आपापल्या परिने आपली बौद्धिक पातळी व आरक्षणाचा द्वेष दाखवला जातो.**

कोणी कोणी स्वयंघोषित विद्वान तर आरक्षणाचा संबंध गरीबीशी जोडून गरिबांना आरक्षण मिळायला पाहिजे अशा मागण्या करतात. गरिबी दुर करण्यासाठी आरक्षण हा उपाय नाही. आरक्षण म्हणजे गरीबी हटावचा कार्यक्रम ही नाही. हे लोकांना अजूनही कळत नसेल तर ते विद्वान स्वतःला कोणत्या आधारावर समजतात हेच कळत नाही. दुसरी गोष्ट स्वतः ला विद्वान समजणाऱ्या लोकांना गरिब लोकांना प्रवाहात आणण्यासाठी संविधानामध्ये किती तरतुदी आहेत याची जाणीव नसेल, आणि गरिब लोकांना शिक्षण व रोजगार संधी निर्माण करून देण्यासाठी संविधान काय सांगते याचा अभ्यास न करता केवळ आरक्षणाचा संबंध गरीबीशी जोडून आरक्षणाची बाजु मांडून आपले अज्ञानच दाखवण्याचा प्रयत्न केला जातो. आरक्षण निर्माण का झाले याची पार्श्वभूमी माहीत नसलेले, राजर्षी शाहुमहाराज यांनी आरक्षण सुरू केल्यावर त्यांना विरोध कोणी व का केला याची याचा अभ्यास नसणाऱ्या लोकांना आरक्षणावर बोलण्याचा नैतिक अधिकार आहे का? जातीची निर्मिती करून माणसाचे सर्व हक्क अधिकार नाकारले गेले. माणसाला माणसा जवळ येऊ दिले जात नव्हते. माणसाच्या स्पर्शाने अपवित्र होणारी गोष्ट गोमुत्राने पवित्र होण्याचा जागतिक सिद्धांत केवळ येथे निर्माण करून माणसाची सावलीही अंगावर पडणे पाप समजले जायचे. जातीच्या आधारावर कामाची वाटणी करून वंशपरंपरागत त्याने तोच व्यवसाय करून उदरनिर्वाह करायचा. स्वतः च्याच व्यवसायाला धर्म बनवून त्यामध्येच त्यांना अडकून ठेवल्या गेले. शिक्षण व हक्क नाकारले गेले. जेथे माणसाच्या सावलीचा विटाळ व्हायचा, माणसाला पात्यापासून दुर ठेवले जायचे, गावात प्रवेश नसायचा, सार्वजनिक ठिकाणी बसता येत नव्हते. वेठबिगारी च्या नावाखाली लोकांकडून काम करून मोबदला न देता लोकांचे शारीरिक व श्रमिक शोषण केले जायचे, मेलेले जणावरे ओढणे, त्यांची कातडी काढणे, स्वच्छता करणे, भांडी घडवणे, मळ्यातील काम करणे, शेतीतील काम करणे हे काम ठरवून देऊन वंशपरंपरागत कामे त्यांनाच करावे लागत. तर हे गरीबी मुळे करावे लागले की अजून इतर कारणामुळे? याचा विचार कोण करणार आहे. हे सर्व संविधान लागु होण्या अगोदर होते. संविधान लागु झाल्यावर ही खुर्चीवर का बसला म्हणून मारले जाते, मंदीरात का गेला म्हणून मारले जाते, चांगले कपडे का घातले म्हणून मारले जाते, घोडीवर बसून लग्नाची मिरवणूक का काढली म्हणून मारले जाते तर हे गरीबीमुळे घडते की इतर कारणामुळे? याचा विचार कोण व कधी करणार? महात्मा फुले त्यावेळचे मोठे उद्योजक होते, शिकलेले होते त्यांना वरातीमधुन बाहेर काढून दिले जाते ते गरीबी मुळे की इतर कारणामुळे? डॉ बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर नोकरी करतात आणि तेथील कारकुन बाबासाहेब आंबेडकर यांना स्पर्श ही होऊ देत नाही हे गरीबीमुळे की इतर कशामुळे? जर जाती निर्माण करून त्यांना सामाजिक विकासापासून दुर ठेवले जात असेल, त्यांच्या वर अन्याय अत्याचार करून एकाच जातीची, समुहाची मक्तेदारी निर्माण होत असेल तर बाकीच्या लोकांचे काय? त्यांचा सामाजिक विकास होऊन माणसाला माणसा सोबत बसता यावे, माणसाला माणसा सोबत राहता यावे म्हणून आरक्षण निर्माण केले गेले. आरक्षण हे फक्त प्रतिनिधित्व देऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी निर्माण केले गेले आहे. जातीच्या आधारावर संधी नाकारली जात असेल आणि त्या जातीचे पुरेसे प्रतिनिधी नसतील तर थोडक्यात ती जात सामाजिक दृष्टीने मागास असेल तर अशा सर्व जातींना आरक्षणाची गरज आहे. एखादी जात आरक्षणाच्या यादी मध्ये नसेल तर त्यांनी ते सरकारच्या निरक्षणात आणुन देउन आरक्षण मिळवून घ्यावे तो त्यांचा संविधानीक अधिकार आहे. परंतु आरक्षणाची चुकिची मांडणी करून चुकिच्या पद्धतीने आरक्षणाला दोष देऊन आणि आरक्षणाच्या आडून एकाच जातीला लक्ष केल्या जात असतील तर आजही लोकांच्या मनात किती विषमता आहे हे दिसून येते. आरक्षणावर बोलण्या अगोदर ज्यांना आरक्षण दिल्या गेले त्यांना आरक्षणाच्या अगोदर, आणि आरक्षणाच्या नंतरही वैयक्तिक पातळीवर मनातील जी विषमता, द्वेष कमी झाला का? उलट आरक्षणामुळे ज्यांना घर नव्हते ते लोक सरकारी कार्यालय अधिकारी झाले, ज्यांना शिळ्या अन्नावर जगावे लागत होते ते रोज पक्वान्न खात आहे, ज्यांना गावात येण्याची मुभा नव्हती ते गावातून चारचाकी मध्ये फिरत आहेत. ज्यांना अरे कारे करून बोलावे लागत होते, त्यांच्या मुलांना आज साहेब म्हणून बोलावे लागत आहे. म्हणून काही लोकांच्या पोटात दुखत आहे. म्हणजे आरक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या जागाही ज्यांना मान्य नाही, लोकांचा माणूस म्हणून स्विकार करून सन्मान करण्याची




माणसिकता नाही ते लोक खरंच माणसाला सामाजिक न्याय मिळवून देऊ शकतील का हा गंभीर प्रश्न आहे. जेव्हा जातीच्या नावावर अनेक कुटुंबावर हल्ले होतात, खुण होतात, तेव्हा पिडीत लोकांच्या बाजुने एकही शब्द न बोलणारे आरक्षणाबद्दल स्वतःला विद्वान समजण्याचा प्रयत्न करतात पण मुळात ते विद्वान नसुन द्वेषी असतात हेच दिसून येते. बर आपण जेथे आरक्षण नाही अशा क्षेत्राचा विचार केला तर अशा क्षेत्रात कोणाचे वर्चस्व आहे यावर कोणी बोलत नाही. याचे दोन कारणे आहेत. काही विद्वान लोकांना आरक्षण रहित काही क्षेत्र आहेत याचीच कल्पना नाही. दुसरे कारण आरक्षण रहित क्षेत्रात ज्यांची मक्तेदारी आहे त्यांच्या विरोधात बोलले की पाप लागते आणि धर्म धोक्यात येतो. साधे उदाहरण जर बघितले तर दोन डॉक्टर एका शहरात असतील त्यांचे शिक्षण, त्यांचा अनुभव दोन्ही गोष्टी सारख्याच असतील आणि एक स्वंयघोषीत उच्च जातीतील असेल आणि एक वर्षानुवर्षे सामाजिक विकासासापासून दुर ठेवलेल्या अनुसूचित जाती जमाती मधील असेल आणि त्या भागात अनुसूचित जाती जमातीचे लोक कमी असतील कोणत्या डॉक्टर कडे लोक जास्त जातात हे उघड सत्य आहे. म्हणजे आजही ज्ञानाची, माणसाची किंमत नाही तर जातीची किंमत आहे. आणि एक जात दुसऱ्या जातीला लहान मोठे ठरवत असते. हे फक्त उदाहरण म्हणून सांगितले पण आपण उद्योग, मिडिया, सहकार क्षेत्राचा विचार केला तर ज्यांना सामाजिक विकासापासून दुर ठेवल्या गेले होते त्यांना आजही माणूस म्हणून प्रोत्साहन दिल्या जात नाही. आणि हिच सामाजिक विषमता दुर करून सामाजिक मागास लोकांना प्रवाहात आणून समता प्रस्थापित करण्यासाठी आरक्षण आहे. आणि ज्यांना गरीब समुदाया बद्दल खरचं कळवळा आहे त्यांनी संविधान वाचावे. संविधानामध्ये स्पष्ट लिहले आहे आर्थिकदृष्ट्या मागास समुहासाठी शैक्षणिक व रोजगाराची सोय त्या सरकारने करावी. आरक्षणाबद्दल चुकीचे बोलुन स्वतः चे अज्ञान दाखवल्यापेक्षा संविधान वाचुन गरीबी हटावण्याचे उपाय योजना लक्षात घ्यावी यातुन गोरगरीब जनतेचा फायदा होईल आणि संविधाना बद्दल जागृती देखील होईल. राहीला विषय आरक्षणाच्या माध्यमातून एकाच जातीचा विकास झाला आणि त्यामुळे अनेकांच्या पोटात दुखणे सुरू झाले अशा स्वंयघोषीत विद्वानांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी हिंदु धर्मातील अपवाद वगळता सर्वच जातींना आरक्षण आहे. मग त्यांचा विकास झाला की नाही झाला? जर झाला असेल तर तो तुम्हाला का दिसत नाही? नसेल झाला तर का झाला नाही याची समिक्षा करणे गरजचे आहे. संविधाना नंतर त्यांचाच विकास झाला ज्यांनी अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी मातीत गाडून वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून जगायला सुरवात केली. मग तो कोणत्याही जाती धर्माचा असो. जे अजूनही अंधविश्वास, थोतांड, पाखंड आणि भोंदुगीरी मध्ये अडकलेले आहेत, वैज्ञानिक दृष्टिकोन बाजूला सारून अज्ञानाचे जतन करत आहेत त्यांचा विकास होणे शक्य नाही. माणसाचा विकास व्हायचा असेल तर अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी मातीत गाडण्याची शिकवण संतांनी दिली. परंतु देशात एक खुप मोठी शोकांतिका आहे ती म्हणजे जे जनकल्याणाचे व जागृती चे उद्धारक आहेत मग ते संत, महापुरुष असो वा संविधान असो यांना लोकांनी घरात आणुन वाचलेच नाही. म्हणून ज्ञानाचा व जागृती चा प्रकाश अजूनही मोठमोठ्या बंगल्यात गेलाच नाही. म्हणून जेथे ज्ञानच नाही तेथुन अज्ञान बाहेर पडते, आणि आरक्षणावर काहीही बोलले जाते. परंतु या आरक्षणामागे हजारो वर्षांपासून होत आलेला छळ आहे. हा छळ थांबवून माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी आरक्षण आहे. त्याचा संबंध गरिबीशी जोडणे निव्वळ अज्ञान दाखवणे आहे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# सल्लागाराची निवड चुकली तर


आधुनिक केसरी

**निस्वार्थ आणि समर्पित भावनेने सहकार्य करणारा सल्लागार मिळण कठिण दुर्लभ असतं पण तो मिळाला तर महत भाग्य तर आहेच पण तो आपला उत्कर्ष होण्यासाठी पुर्ण ताकदीने सहकार्य करतो. पण अनेकदा सल्लागार हाच आपली विल्हेवाट लावतो हे वास्तव आहे. सल्लागाराची योग्यता पाहुन निवड झाली तर डोकेदुखी ठरत नाही.चांगल्या वेळेला वाईट काळात परावर्तित करण्याचं सामर्थ्य हे अयोग्य सल्लागारात असत.आपला सल्लागार जसा आहे त्या पद्धतीने परिणाम अनुभवायला येत असतात. जीवनाची दिशा आणि दशा हि सल्लागारावर अंवलबुन असते.आपला सल्लागार कसा आहे त्यानुसार त्या वेळी त्या कालखंडात आपलं जीवन ठरत असतं. प्रत्येकाला आयुष्यात श्रीकृष्ण मिळेलच असं नाही बहुतांश वेळा जीवनात आपल्याला अयोग्य सल्लागार देखिल मिळु शकतो.**

जीवनात जसा सल्लागार असतो तसं आपलं जीवन हे सुत्र निश्चित असतं.जीवनात निश्चित असं काही नसतं होत्याच नव्हत होण्यासाठी एक क्षण पुरेसा असतो.सुख,दुःख चांगला वाईट कालावधी चांगली वाईट वेळ हे सगळं नैसर्गिक असल्याने ते विहीत कालावधीत येणार आणि जाणार देखिल या मध्ये शंका नाही.पण वाईट काळात देखील आपल्याला उभा करण्याची ताकद योग्य सल्लागारात असते.पण हाच सल्लागार जर अयोग्य लाभला तर मग तो आपल्या जीवनाची दिशा बदलतो संकटकाळी सल्लागार योग्य असेल तर आपण उभा राहणार या मध्ये शंका नाही पण उलट सल्लागार चुकीचा लाभला तर वाईट वेळेत मानुस संपण्याच्या दिशेने प्रवास करतो.त्याचा बरोबर या उलटं चांगली वेळ असली आणि सल्लागार चुकीचा लाभला तर तो चांगल्या वेळेला सुद्धा आपला प्रवास संपवण्याच्या दिशेने घेऊन जाते उलट चांगल्या वेळेत योग्य सल्लागार लाभला तर आपण जिथे आहेत त्या पेक्षा हि यशोशिखरावर जातो. पण जर का यशोशिखरावर असणारा थेट जमिनीवर आला तर सल्लागार चुकीचा लाभला आहे हे निश्चित आहे.काही क्षणात अति उच्च शिखरावर असणारा व्यक्ती रस्त्यावर आणण्याचा महान कार्य फक्त अयोग्य सल्लागार च करू शकतो. तसेच सर्वसाधारण व्यक्तिला अति उच्च शिखरावर पोहचविण्यासाठी सुद्धा योग्य सल्लागार खुप मोठी भुमिका आदा करतो. एकंदरीत जसा आपला सल्लागार आहे तसंच आपलं आयुष्य आणि भविष्या घडत मग ते उज्ज्वल असो कि खडतर असो. सल्लागार हाच किंगमेकर असतो अगदी पुरातन काळापासून अस्तित्वात असलेल्या मानवी व्यवस्थेचं आपण बारकाईने निरीक्षण केले तर एक गोष्ट आपल्या लक्षात येते. ती म्हणजे राजा असो, कि महाराजा असो ऋषी असो कि मुनी असो किंवा सर्वसाधारण मानव सल्लागार हि युगा युगाची परंपरा आहे.आपलं व्यवस्थित समाधानी जीवन एका सल्याने बिघडु शकत आणि बिघडलेल जीवन एका सल्याने व्यवस्थित होऊ शकत एकंदरीत सल्ला आणि सल्लागार कसे यावरच सगळं अवलंबून असतं.थोडक्यात आपल्या जीवनाच्या गाडीचा चालक म्हणजे च सल्लागार आणि चालक जर सुयोग्य सुसंस्कृत, प्रभावी, निपुण, सर्व गुणसंपन्न, चाणक्य, यथा योग्य असेल तर कसल्याही उचित अनुचित परस्थिती वर आपण मात करून शकतो.म्हणून जीवनातील सल्लागार खुप महत्वपूर्ण आहे. भगवान श्री कृष्णा यांच्या सारखा सल्लागार मिळाला म्हणून तर नगण्य अशा संख्या बळावर सुद्धा पांडव विशालकाय संकाटावर मात करत करत यशस्वी झाले.जीवनाच्या वाटेवर चालत असताना आपला प्रवास किती खडतर किंवा सुखकर आहे याच मुल्यमापन आपला सल्लागार सुयोग्य आहे कि योग्य आहे यावरच अवलंबून असतं. म्हणून योग्य सल्लागार हा परम भाग्यने मिळतो. जीवनामध्ये जर आपल्याला कोणत्याही क्षेत्रात जसं कला, क्रीडा, संस्कृती, खेळ, साहित्य, उद्योग, रोजगार,स्वयंरोजगार, अध्यात्म, समाजकारण, राजकारण, व्यवसाय,नोकरी तसेच सामाजिक जीवन या सर्व क्षेत्रात आपल्यला झेप घेण्यासाठी सल्लागार लागतोच मग आपण साधारण व्यक्ती असो कि सेलिब्रिटी उच्चतम ठिकाणी पोहचण्यासाठी सल्लागार हा आवश्यक असतोच. अपवादात्मक परिस्थितीत काही लोक स्वकर्तुत्वाने पुढे आलेले असतात त्यांना सल्लागार यांची आवश्यकता जाणवतं नाही मात्र असे लोक नाममात्र असतात बहुतांश लोकांना सल्लागार हा आवश्यक असतोच काही मोजक्या लोकांच्या अपवाद वगळला तर प्रत्येकाला आपल्यला जीवनात मार्गक्रमण करत असताना सल्लागार आवश्यक असतोच पण तो सल्लागार जर योग्य लाभला तर निश्चितच आपण कुठेही अडचणीत येणार नाही, संकटात, सापडणार नाही किंवा कुठल्याही संकटातुन योग्य मार्ग काढत आपण योग्य ठिकाणी पोहचु शकतो.तर सल्लागार चुकीचा मिळाला तर मग मात्र आपल्या जीवनात होत्याच नव्हत झाल्याशिवाय राहणार नाही.विषय लहान असो कि मोठा समस्या गंभीर असो कि सर्वसाधारण अंत्यत कमी लोक स्व विवेकावरून निर्णय घेतात. परंतु बाहुतांश लोकांना निर्णय घेण्यासाठी सल्लागाराची आवश्यकता असते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



यो गमहर्षी बी.के.एस ? पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १४ डिसेंबर २०२३



बावनकुळे जेव्हा सहकारी पदाधिकाऱ्यांचा पाहुणचार करतात पान ७


# केंद्रीय पथकाकडून दुष्काळाची पाहणी

## शेतकरी आणि ग्रामस्थांशी साधला संवाद

आधुनिक केसरी न्यूज



**धाराशिव :** जिल्ह्यात उद्भवणाऱ्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या पथकाने आज 13 डिसेंबर रोजी धाराशिव आणि लोहारा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. धाराशिव तालुक्यातील करजखेडा महसूल मंडळातील ताकविकी आणि करजखेडा, लोहारा तालुक्यातील मार्डी, धानोरी, माळेगाव, तावशीगड व लोहरा(बु) बुद्रुक शिवारातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली.

या पथकाने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवादही साधला.चालू वर्षी खरीप हंगामात सोयाबीन पिकाची पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना त्यांनी किती बियाणे पेरले होते,किती खर्च आला आणि आता जनावरांच्या चाऱ्याची काय व्यवस्था आहे. तसेच येणाऱ्या काळात काय नियोजन केले आहे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांची मागणी केली आहे का अशी विचारणा उपस्थित शेतकऱ्यांना पथकातील सदस्यांनी केली. केंद्रीय पथकाने जिल्ह्यात उदभवणाऱ्या संभाव्य दुष्काळी परिस्थितीविषयी आवश्यक त्या नोंदी करून आपला अहवाल केंद्र सरकारकडे पाठवणार असल्याचे सांगितले.या पथकामध्ये केंद्र सरकारच्या ग्रामविकास मंत्रालयाचे सहाय्यक आयुक्त श्री.मोतीराम,केंद्रीय आपत्ती निवारण मंत्रालयाचे उपसचिव श्री.मनोज कुमार,नीती आयोगाचे संशोधन अधिकारी श्री. शिवचरण मीणा यांचा समावेश आहे.

केंद्रीय पथकाने शिवारातील पाणीपुरवठ्याच्या विहिरीची पाहणी केली.पाण्याची खालावत चाललेली पातळी याबद्दल ग्रामस्थांशी चर्चा केली.लोहारा (बु) शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतीला भेट देऊन उपस्थित शेतकऱ्यांशी चर्चा करून परिस्थितीची माहिती घेतली.तसेच पथकातील सदस्यांनी शासनाच्या योजनांबाबत तसेच मिळणाऱ्या विविध योजनांच्या लाभाबाबत उपस्थित शेतकरी आणि ग्रामस्थांकडून माहिती घेतली. यावेळी पथकासोबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता,अप्पर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे,विभागीय कृषी अधीक्षक महेश तिर्थकर,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. यतीन पुजारी,धाराशिव उपविभागीय अधिकारी डॉ.योगेश खरमाटे,उमरगा उपविभागीय अधिकारी गणेश पवार, धाराशिवचे तहसीलदार शिवानंद बिडवे, लोहरा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी व कृषी उपसंचालक अभिमन्यू काशीद यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शेतकऱ्याला १४ वर्षांनी मिळाला न्याय

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** इगतपुरी तालुक्यातील सन. २०१० मध्ये टाकेघोटी येथील शेतकरी यांची जमीन गोरख तोकडे यांनी थोडी रक्कम देऊन जमीनीचे साठेखत लिहुन घेतले होते. नंतर या त्यांनी ही जमीन इगतपुरीतील एका व्यापाऱ्याला विकली. मात्र शेतकऱ्याला जमीनीचा पुर्ण मोबादला न मिळाल्याने शेतकरी जमीनीचा ताबा सोडत नव्हता. याचा वाद गेल्या १४ वर्षापासुन सुरु होता. टाकेघोटी येथील शेतकरी जगन्नाथ आतकरी यांच्याकडुन गोरख तोकडे यांनी सन. २०१० मध्ये काही रक्कम देऊन शेत जमीनीचे साठेखत लिहुन घेतले होती. पुढे ही शेत जमीन गोरख तोकडे यांनी मध्यस्थी मार्फत इगतपुरी शहरातील व्यापारी प्रविण चेतमल लुणावत यांना विकली. मात्र शेतकरी जगन्नाथ आतकरी यांना व्यापारी प्रविण लुणावत यांनी जमिनीचा पूर्ण मोबदला न दिल्याने ते या जमिनीचा कब्जा सोडण्यास तयार नव्हते. याबाबत इगतपुरी न्यायालयात १४ वर्षांपासून हा वाद सुरु होता. अखेर अँड. रोहित उगले यांनी यशस्वी मध्यस्थी करून शेतकरी, व्यापारी प्रविण लुणावत, गोरख तोकडे व मध्यस्थी सतिष कर्पे, विजय शिंदे, राजु लहाने यांच्या सलग १५ बैठका घेतल्या. शेवटच्या झालेल्या बैठकीत शेतकरी जगन्नाथ आतकरी यांना व्यापारी प्रविण लुणावत यांनी ४० लाख रुपये देण्यात यावे व शेतकरी यांनी जमीनीचा कब्जा सोडावा असे ठरले. या नंतर हा वाद इगतपुरी न्यायालयाच्या लोक अदालत मध्ये अँड. रोहीत उगले यांनी मांडुन यशस्वी भुमिका निभावल्याने ही केस निकाली काढण्यात आली.

# धारतीर्थ स्नानासाठी पंधरा दिवस खुले

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** डॉ. गोपाल बशीरे (बच्छिरे) यांच्या आत्मदहनाच्या इशाऱ्या नंतर जिल्हा प्रशासन व पुरातत्त्व विभाग यांनी आज १२ डिसेंबर २०२३ रोजी लोणारचे विरज धारतीर्थ हे तीर्थस्नानासाठी पंधरा खुले केले आहे. डॉ. गोपाल बशीरे यांनी २२ नोव्हेंबर रोजी माननीय जिल्हाधिकारी बुलढाणा तसेच नागपूर येथील अधीक्षक पुरातत्त्व विभाग यांना निवेदनाद्वारे जर लोणारचे विरज धारतीर्थ हे १२ डिसेंबर पूर्वी म्हणजेच लोणी यात्रा महोत्सवा पूर्वी तीर्थस्नानासाठी खुले केले नाही तर लोणार धार तिर्थासमोर आत्मदहन करू असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने बुलढाणा जिल्ह्याचे संघटक प्रा. डॉ. गोपाल बशिरे यांनी दिला होता. त्यानंतर जिल्हा प्रशासन व पुरातत्व विभाग खडबडून जागे झाले आणि १२ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता पुरातत्त्व विभाग व जिल्हाधिकारी यांनी स्नानासाठी खुले करण्याचे आदेश पारित केले. पंधरा दिवसासाठी का होईना भाविक व पर्यटकांना स्नान करता येणार आहे.

# खा. गोडसे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज



**इगतपुरी :** गेल्या काही महिन्यांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आज कल्याण डोंबिवली लोकसभा मतदार संघाचे खा. श्रीकांत शिंदे आणि खा. हेमंत गोडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत इगतपुरी तालुक्यातील विविध संघटनांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा खा. शिंदे यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी पार पडला. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जिल्ह्यात खा. हेमंत गोडसे यांची सकारात्मक काम करण्याची पद्धत भावत असल्यानेच आज आम्ही शिवसेनेत प्रवेश करीत असल्याची प्रतिक्रीया प्रवेशार्थींनी व्यक्त केली आहे. दरम्यान तालुक्यात शिवसेना वाढीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा, याकामी आम्ही सतत आपल्या पाठीशी असू अशी ग्वाही खा. शिंदे यांनी प्रवेश कर्त्यांना दिली आहे.

जिल्हाभर शिवसेनेच्या विस्तारासाठी गेल्या सहा महिन्यांपासून खा. हेमंत गोडसे प्रयत्नशील आहेत. खासदार गोडसे यांनी गेल्या तीन महिन्यात नाशिक, सिन्नर, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यांमध्ये शिवसेनेच्या शेकडो शाखांचे उदघाटन करून शाखाप्रमुखांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामुळे जिल्ह्यात शिवसेचा झंझावात सुरू झाला आहे. खा. गोडसे यांच्या प्रयत्नातून इगतपुरी तालुक्यातील विविध संघटना आणि संस्थांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आज कल्याण डोंबिवली लोकसभा मतदार संघाचे खा. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. प्रवेशार्थींमध्ये इगतपुरी येथील प्रसिद्ध पी. के. डेव्हलपर्सचे सर्वेसर्वा प्रशांत कडू, इगतपुरीच्या माजी नगराध्यक्षा जनाबाई खातळे यांचे चिरंजीव संजय खातळे, लॅन्ड विकसक विनायक पाटील, सामाजिक कार्यकर्ते जगन कदम, अल्पसंख्यांक आघाडीचे फिरोज शेख, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत कदम, भारतीय कामगार सेना राज्य कार्यकारी सदस्य दशरथ भागडे, युवा उद्योजक योगेश भागडे, नंदु कडू, मतिन पठाण, सचिन खातळे, प्रकाश आडोळे, अय्याज पठाण, सलीम पटेल, शादाब शेख आदिंसह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश आहे. हजारोंच्या प्रवेशासाठी इगतपुरीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात येणार असल्याची ग्वाही प्रवेशार्थींनी खा.श्रीकांत शिंदे यांना दिली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल ढिकले, माजी आमदार काशिनाथ मेंगाळ उपजिल्हाध्यक्ष रघुनाथ तोकडे, बाळा गव्हाणे आदी उपस्थित होते.

# गुंगीकारक औषधाच्या बाटल्या व गोळ्यांची विक्री करण्यारे रॅकेट ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज




**धुळे :** विनापरवाना गुंगीकारक औषधाच्या बाटल्या व गोळयांची विक्री करण्यारे मोठे रॅकेट उघड एक लाख रु किमतीचा मुद्देमाल सहित आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद करण्यात आले.

दिनांक १२ रोजी पोलीस अधीक्षक, धुळे श्री. श्रीकांत धिवरे यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, इसम नामे विकास ऊर्फ विक्की मोहन चौधरी रा.दंडेवाला बाबा नगर, मोहाडी याने त्याचे घरात गुंगीकारक औषधाच्या बाटल्यांची चोरटी विक्री करण्याच्या उद्येशाने साठा करुन ठेवला असल्याबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. सदर बातमीची खात्री करुन पुढील योग्य तो कायदेशीर कारवाई करणे बाबत पो.नि.श्री. दत्तात्रय शिंदे यांनी बाळासाहेब सूर्यवंशी व स्था. गु. शाखेकडील पथकास आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने पथकाने इसम नामे विकास ऊर्फ विक्की मोहन चौधरी वय ३६ रा. दंडेवाला बाबा नगर मोहाडी यास त्याचे राहते घरुन ताब्यात घेवुन त्याचे घराची घरझडती घेतली असता, त्यात खालील नमुद वर्णनाचा गुंगीकारक औषधाच्या बाटल्या व गोळया मिळून आल्या. PHOSPHATE हा प्रतिबंधीत गुंगीकारक घटक असलेल्या १७० बाटल्या २६०००, ALPRAZOLAM हा प्रतिबंधीत गुंगीकारक घटक असलेल्या गोळयांचे १६० स्ट्रीप ५१२०, गुंगीकारक घटक असलेल्या बाटल्या व गोळया जप्त करुन सदरचा माल त्याने लुकेश चौधरी रा. देवपुर, धुळे (रिंकु मेडीकल) याचेकडून खरेदी केल्याचे सांगितल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचे संपूर्ण नाव गाव विचारता लुकेश अरुण चौधरी बय ३० रा. देवपुर असे सांगितले. त्याने गुन्ह्याची कबुली देवून अशाच प्रकारचा मुंगीकारक माल अवैधरित्या रिंकू मेडीकलचे मालक प्रमोद येवले यांचेकडे असल्याचे सांगितले. पथकाने प्रमोद अरुण देवले वय ३४ रा.देवपुर धुळे यास ताब्यात घेवून विचारपूस करता त्याने त्याचे राहते घरातुन ३६७५०/- कि, च्या CODEIN PHOSPHATE हा प्रतिबंधीत गुंगीकारक घटक असलेल्या २१० बाटल्या प्रमाणेचा गुंगीकारक घटक असलेल्या बाटल्या जप्त करुन सदरचा माल त्याने मुकेश पाटील रा. वाडीभोकर, धुळे याचेकडून खरेदी केल्याचे सांगितल्याने त्याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारता मुकेश आनंदा पाटील वय ३५ रा. वाडीभोकर धुळे असे सांगुन गुन्ह्याची कबुली दिली. मुकेश पाटील यास विश्वासात घेवून विचारपुस करता त्याने त्याचे राहते घरातुन काही वर्णनाचा मिळून आला असा एकूण १,०३,६३०/- किमतीच्या गुंगीकारक औषधाच्या एकुण ५८०/- बाटल्या आणि गुंगीकारक औषधाच्या एकुण ३४० स्ट्रिप (५१०० गोळ्या) जप्त करण्यात आल्या असुन इसम नामे १) विकास ऊर्फ विक्की मोहन चौधरी वय ३६ वर्षे ०२) लुकेश अरुण चौधरी वय ३० वर्षे ०३) प्रमोद अरुण येवले वय ३४ वर्षे ०४) मुकेश आनंदा पाटील वय ३५ वर्षे सर्व रा. धुळे यांचे विरोधात मोहाडी नगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे. सदरची कारवाई श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, धुळे, श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक, धुळे बांचे मार्गदर्शना खाली स्था.गु.शा.चे पो.निरी.श्री. दत्तात्रय शिंदे, पोसई/बाळासाहेब सुर्यवंशी, पोसई योगेश राऊत, पोसई/अमरजित मोरे, असई/संजय पाटील, श्याम निकम, दिलीप खोंडे, पोहवा/संदिप सरगपोना/ पंकज खैरमोडे, चेतन बोरसे, प्रशात चौधरी, पोकों/ जितेंद्र वाघ, किशोर पाटील, योगेश जगताप, महेंद्र सपकाळ चापोकों/कैलास महाजन व राजु गिते अशांनी केली आहे.

# सर्वोच्च निर्णयाने राष्ट्रीय एकात्मता मजबूत होईल



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्याचा मोदी सरकारचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने वैध मानला आहे. निकाल देताना सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले की, जम्मू-काश्मीरला भारतात विलीन झाल्यानंतर अंतर्गत सार्वभौमत्वाचा अधिकार नाही. कलम ३७० ही तात्पुरती तरतूद होती. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने राष्ट्रीय एकात्मता मजबूत होईल. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या निर्णयाला ऐतिहासिक म्हटले. जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० रद्द करण्याच्या कायदेशीरतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालय महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी संसदेनं जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० रद्द केला आणि राज्याचे जम्मू आणि काश्मीर आणि लडाख असे दोन भाग केले आणि दोन्ही केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित केले.**

याविरोधात सर्वोच्च न्यायालयात २३अर्ज दाखल करण्यात आले होते, त्या सर्वांची सुनावणी घेतल्यानंतर कोर्टानं सप्टेंबरमध्ये निर्णय राखून ठेवला होता आणि सर्वोच्च निर्णय देण्यात आला आहे. म्हणजेच, ३७० रद्द केल्यानंतर ४ वर्ष, ४महिने, ६ दिवसांनी ११ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालय निर्णय दिला.सर्वोच्च न्यायालयाने भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता कायम ठेवली आहे. ५ऑगस्ट २०१९रोजी घेतलेला निर्णय हा विघटनाच्या उद्देशाने नव्हे तर घटनात्मक एकात्मता वाढवण्याच्या उद्देशाने घेण्यात आला होता, असे म्हणणे सर्वोच्च न्यायालय पूर्णपणे न्याय्य आहे. कलम ३७०चे स्वरूप कायमस्वरूपी नव्हते हे सुप्रीम कोर्टानेही मान्य केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात काय म्हटले ? कलम ३७०च्या मुद्द्यावर पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने तीन निर्णय दिले आहेत. CJI म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने जम्मू-काश्मीरमधील राष्ट्रपतींच्या घोषणेच्या वैधतेवर निर्णय देण्याची गरज नाही कारण याचिकाकर्त्यांनी त्यास आव्हान दिलेले नाही. राष्ट्रपती राजवटीत केंद्राकडून कोणतीही अपरिवर्तनीय कारवाई करता येणार नाही, हा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. राष्ट्रपती राजवटीत केंद्राने राज्याच्या वतीने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाला आव्हान देता येणार नाही, असे सीजेआय म्हणाले. जम्मू आणि काश्मीरला देशाच्या इतर राज्यांपेक्षा वेगळे अंतर्गत सार्वभौमत्व नाहीः CJI जम्मू आणि काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, हे घटनेच्या कलम १ आणि ३७० मध्ये स्पष्ट आहेः CJI म्हणतात की घटनेचे कलम ३७० तात्पुरते होते , तो रद्द करण्याचा राष्ट्रपतींचा अधिकार अजूनही अस्तित्वात आहे. CJI म्हणाले की कलम ३७० ही राज्यातील युद्ध परिस्थितीमुळे अंतरिम व्यवस्था होती.



CJI म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरची संविधान सभा ही कायमस्वरूपी संस्था बनण्याचा कधीच हेतू नव्हता. जेव्हा जम्मू आणि काश्मीरची संविधान सभा संपुष्टात आली, तेव्हा ज्या विशेष अटसाठी कलम ३७० लादण्यात आले होते तेही संपुष्टात आलेः CJI आम्हाला विश्वास आहे की केंद्राची संमती राष्ट्रपतींनी घेतली होती, राज्याची नाही. वैध आहे, सर्व भारतीय संविधानाच्या तरतुदी जम्मू आणि काश्मीरला लागू केल्या जाऊ शकतातः CJI आम्ही निर्देश देतो की जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेशाला शक्य तितक्या लवकर राज्याचा दर्जा बहाल करण्यात यावा, असे CJI म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, आम्ही संविधानातील कलम ३७० रद्द करण्याचा घटनात्मक आदेश जारी करण्याच्या राष्ट्रपतींच्या अधिकाराचा वापर वैध मानतो. CJI म्हणाले, आम्ही जम्मू-काश्मीरमधून लडाख केंद्रशासित प्रदेश बनवण्याच्या निर्णयाची वैधता कायम ठेवतो. CJI म्हणाले की अध्यक्षीय अधिकार वापरताना सल्लामसलत आणि सहकार्याचे तत्व पाळणे आवश्यक नाही. CJI शी सहमत, न्यायमूर्ती एस के कौल म्हणाले की कलम ३७० चा उद्देश जम्मू आणि काश्मीरला हळूहळू इतर भारतीय राज्यांच्या बरोबरीने आणणे आहे. . होते. कलम ३७० मधील जम्मू आणि काश्मीर संविधान सभेच्या शिफारशीची आवश्यकता अशा प्रकारे वाचली जाऊ शकत नाही ज्यामुळे मोठा हेतू शून्य होईलः न्यायमूर्ती कौल. जम्मू-काश्मीरमध्ये लवकर निवडणुकांसाठी पावले उचलावीत. जम्मू-काश्मीरमध्ये ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत निवडणुका व्हाव्यात. एक ऐतिहासिक निर्णय घेत भारत सरकारने २०१९ साली देशातून वादग्रस्त कलम ३७० रद्द केले होते. त्याची सुरुवात काश्मीरचा राजा हरिसिंह यांच्यापासून झाली. ऑक्टोबर १९४७मध्ये, काश्मीरचे तत्कालीन महाराजा, हरि सिंह यांनी विलयीकरणाच्या करारावर स्वाक्षरी केली. या पत्रात म्हटले आहे की परराष्ट्र व्यवहार, संरक्षण आणि दळणवळण या तीन विषयांच्या आधारे जम्मू-काश्मीर आपली सत्ता भारत सरकारकडे हस्तांतरित करेल.इतिहासाबद्दल बोलायचे झाले तर मार्च १९४८ ला जावे लागेल. महाराजांनी शेख अब्दुल्ला पंतप्रधान म्हणून राज्यात अंतरिम सरकार नेमले. जुलै १९४९ मध्ये, शेख अब्दुल्ला आणि इतर तीन सहकारी भारतीय संविधान सभेत सामील झाले आणि जम्मू आणि काश्मीरच्या विशेष दर्जाबाबत बोलणी केली, ज्यामुळे कलम ३७० स्वीकारले गेले. शेख अब्दुल्ला यांनी वादग्रस्त तरतुदीचा मसुदा तयार केला होता.

कायदा रद्द करण्यापूर्वी कलम ३७९च्या काय तरतुदी होत्या? १ संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, वित्त आणि दळणवळण या बाबी वगळता – राज्यात कायदे करण्यासाठी संसदेला जम्मू आणि काश्मीर सरकारची मंजुरी आवश्यक आहे.

२ जम्मू आणि काश्मीरमधील रहिवाशांचे नागरिकत्व, मालमत्ता मालकी आणि मूलभूत हक्कांचे कायदे उर्वरित भारतातील रहिवाशांपेक्षा वेगळे होते. कलम ३७० अन्वये इतर राज्यातील नागरिकांना जम्मू-काश्मीरमध्ये मालमत्ता खरेदी करता येत नाही. तसेच, या अंतर्गत राज्यात आर्थिक आणीबाणी जाहीर करण्याचा अधिकार केंद्राला नव्हता.

जम्मू-काश्मीरची राज्यघटना काय होती?

जम्मू आणि काश्मीरच्या तत्कालीन राज्यघटनेची प्रस्तावना आणि कलम ३ मध्ये असे म्हटले आहे की जम्मू आणि काश्मीर राज्य भारताच्या संघराज्याचा अविभाज्य भाग आहे आणि राहील. कलम ५ मध्ये असे नमूद केले आहे की राज्याची कार्यकारी आणि कायदेमंडळाची शक्ती भारताच्या राज्यघटनेच्या तरतुदींनुसार राज्यासाठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला असलेल्या सर्व बाबींसाठी विस्तारित आहे. १७ नोव्हेंबर १९५६रोजी राज्यघटना स्वीकारण्यात आली आणि २६ जानेवारी १९५७ रोजी अंमलात आली. ५ ऑगस्ट २०१९रोजी भारताच्या राष्ट्रपतींनी जारी केलेल्या संविधान (जम्मू आणि काश्मीरला लागू) आदेश, २०१९(CO 272) द्वारे जम्मू आणि काश्मीरची राज्यघटना रद्द करण्यात आली.

# उज्ज्वल भविष्यासाठी वीज वाचवा!



ज्ञानेश्वर आर्दड
जनसंपर्क अधिकारी, महावितरण
संपर्क क्र. : 9850107300

आधुनिक केसरी

**दरवर्षी 14 डिसेंबर हा राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन तर 14 डिसेंबर ते 20 डिसेंबर हा राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह म्हणून साजरा केला जातो. सर्व स्तरावरील उपभोक्त्यांना ऊर्जा बचतीचे महत्व अवगत करून दैनंदिन जीवनामध्ये ऊर्जेचा वापर अत्यावश्यक वेळीच केला जावा या प्रमुख उद्देशामुळेच या संवर्धन दिनाचे आणि सप्ताहाचे आयोजन केले जाते. विविध क्षेत्रामध्ये ऊर्जा संवर्धनाचा वाव आणि ऊर्जा कार्यक्षमतेचे महत्त्व पाहता केंद्र शासनाने ऊर्जा संवर्धन कायदा २००१ पारित केला आहे. या कायद्याच्या माध्यमातून ऊर्जा वापर कमी होण्यासाठी विविध योजना तयार करण्याच्या अनेक तरतूदी आहेत.**

मानवी जीवनात सामान्यतः अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा म्हणून ओळखल्या जातात. परंतू जागतीकी करणाच्या आजच्या युगात "ऊर्जा" अर्थात "वीजे"चाही मूलभूत गरजांमध्ये समावेश झालेला आहे. आज ऊर्जेची गरज नैसर्गिक इंधनाचे साठे जसे, कोळसा, खनिज तेल, वायू यावरच भागवली जाते. इंधनाचे साठे मर्यादीत स्वरूपात असून कोळसा ११४ वर्षे, खनिज तेल २० वर्षे तर वायु केवळ ३६ वर्षे पुरेल एवढाच शिल्लक आहे. दैनंदिन जीवनात मोठया प्रमाणावर वापर होत असलेली विद्युत ऊर्जेची निर्मितीदेखील मोठ्या प्रमाणावर कोळशापासूनच केली जाते. ग्लोबल वार्मिंग सारख्या जागतिक स्तरावरील गंभीर समस्येला सामोरे जात असताना ऊर्जेचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी ऊर्जा संवर्धनाविषयी सर्व घटकांमध्ये जनजागृती होणं अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर मानवाच्या एकूणच वर्तणुकीमध्ये बदल घडवून आणल्याशिवाय आपल्या वसुंधरेचे रक्षण होणं अशक्यप्राय आहे. त्यामुळे विजेच्या बचतीचा मंत्र हाच ऊर्जा संवर्धनाचे खरे तंत्र ठरणार आहे.

भारताने पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याच्या प्रवासाला सुरुवात केली आहे. अलीकडेच सीओपी २६ मध्ये भारताने २०३० पर्यंत भारताच्या जिडेपी ची उत्सर्जन तीव्रता २००५ च्या तुलनेत ४५ टक्के पातळीपर्यंत कमी करण्यासाठी कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याचे लक्ष्य निर्धारीत केलेले आहे. भारताची ऊर्जा क्षेत्रातील कामगिरी ही निश्चितच कौतूकास्प्द आहे. आपली दळणवळण व्यवस्था ही पूर्णतः कच्च्या तेलावर, जीवाश्म इंधनावर आधारित आहे. भारताचा २००० सालापासून ऊर्जा वापर जवळपास दुप्पट झाला



आहे. जो जागतिक सरासरीच्या एक तृतीयांश आहे. सन २००७ साली दरडोई ६७२ किलोवॅट विजेचा वापर सन २०२२ साली १२५५ किलोवॅट झालेला आहे. ग्लोबल कार्बन प्रोजेक्ट या संस्थेने वाढती लोकसंख्या आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था यामुळे भारतातील उत्सर्जन अलिकडच्या दशकात वाढले असल्याचे नमूद केले आहे. या वाढीमुळे भारत देश, चीन आणि अमेरिकेनंतर जगातील तिसरा सर्वात मोठा हरितगृह वायू उत्सर्जित करणारा देश बनला आहे; २०२१ मध्ये भारताने ३.९ अब्ज मेट्रिक टन कार्बन डायऑक्साइड समतुल्य उत्सर्जित केले, जे जागतिक पातळीच्या एकूण ७ टक्के आहे. भारताचा आर्थिक विकास होत असतानाच कार्बन उत्सर्जन वाढत असल्याचा निष्कर्ष या अहवालात काढण्यात आला आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या मार्च २०२१-२२ च्या अहवालानुसार भारताची एकूण वीज निर्मिती ही १४ लाख ८४ हजार ४६३ गिगावॅट असून यामध्ये कोळशाची ऊर्जा ही ११ लाख १४ हजार ८११ गिगावॅट एवढी आहे. तर पाणी १ लाख ५१ हजार ६२७ गिगावॅट तसेच नवीकरणीय ऊर्जेचे प्रमाण १ लाख ७० हजार ९१२ गिगावॅट एवढे आहे. एकूणच ऊर्जा संवर्धना विषयी विचार करत असताना असे लक्षात येते की, भारताची ऊर्जा निर्मिती आजही कोळशावर अवलंबून आहे. दिवसेंदिवस विजेची वाढत जाणारी मागणी आणि पुरवठा यात ताळमेळ घालण्याच्या दृष्टिने विजेची बचत ही काळाची गरज बनलेली आहे. देशात इंधनाचे साठे मर्यादीत आहेत. कोळसा, तेल व गॅस मोठया प्रमाणावर आयात केली जातात. त्यामुळे आपल्या देशातील इंधन साठे भावी पिढीला उपयोगी ठरतील यासाठी ऊर्जेचा वापर अधिकाधिक कार्यक्षमतेने व काटकसरीने करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय स्तरावर स्थापीत ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिअन्सी, नवी दिल्ली यांच्या अहवालानुसार ऊर्जा संवर्धनासाठी पथदिवे आणि पाणीपुरवठा याक्षेत्रामध्ये 20 टक्के, घरगुती क्षेत्रात 20 टक्के, व्यावसायिक क्षेत्रात 30 टक्के, उद्योग क्षेत्रात 25 टक्के आणि कृषी क्षेत्रात 30 टक्के याप्रमाणे आपण ऊर्जेची बचत करू शकतो. याकरिता ऊर्जा संवर्धनासाठी उपलब्ध होणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञान वापरास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. विजेची निर्मिती कोळशापासून करताना पाण्याचाही वापर मोठया प्रमाणावर केला जातो. ऊर्जा बचत केल्यास ऊर्जा बचतीसोबतच पाण्याचीही बचत होईल. तसेच प्रदूषण कमी होऊन पर्यावरणाचा ऱ्हास कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे ऊर्जा संवर्धन व ऊर्जा कार्यक्षमता ही संस्कृती सर्व क्षेत्रात नागरिकांनी अंगिकारणे अत्यावश्यक आहे. यासाठी विदयार्थ्यापासून ते वृध्दांपर्यंत सर्वांनी जागरूकपणे ऊर्जेचा वापर केला पाहिजे. त्याचबरोबर व्यक्तिशः प्रयत्न करण्याबरोबरच सर्व शासकीय, निमशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारितील क्षेत्रात ऊर्जा संवर्धनासाठी पुढाकार घेऊन सुरवात करणे आवश्यक आहे. शासकीय, निमशासकीय क्षेत्रात ऊर्जा वापर उपकरणांची खरेदी करतांना ऊर्जा कार्यक्षमतेचे निकष विचारात घेणे गरजेचे आहे. तसेच ऊर्जा कार्यक्षमतेच्या निकषांवर आधारीत नवीन इमारती, रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा यंत्रणा यांची उभारणी करणे अत्यावश्यक आहे. आपल्या जीवनातील केंद्रस्थानी असलेल्या ऊर्जेबाबतची आपली उदासिनता व बेफिकीरी आपल्या व भावी पिढीकरिता घातक ठरू शकते. म्हणूनच ऊर्जेविषयी अधिक जागरूकता दाखवत ऊर्जेचे संवर्धन, म्हणजेच वसुंधरेचे रक्षण हा मूलमंत्र मनाशी, मेंदूशी घट्ट बाळगून ठेवायला हवा.

आज आपण जगात वेगाने विकसित होत आहोत. या विकासाच्या प्रक्रियेत ऊर्जेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहेत. वायू प्रदूषण, हवामान बदल, पर्यावरणीय आपत्ती अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. ऊर्जा संवर्धन हा पर्यावरण संरक्षणासाठी एक महत्त्वाचा उपाय आहे. ऊर्जा संवर्धन म्हणजे उपलब्ध ऊर्जेचा अधिकाधिक कार्यक्षमतेने वापर करणे. ऊर्जा संवर्धन केल्याने ऊर्जेची बचत होते आणि पर्यावरणावर होणारा दबाव कमी होतो.

**दैनंदिन जीवनातील ऊर्जा बचतीच्या काही सुलभ सुचना**

१. गरज नसेल तेंव्हा विद्युत उपकरणे आणि दिवे बंद करणे. २. वापरात नसेल तेंव्हा विद्युत उपकरणांचे मेन स्वीच बंद ठेवा. उदा. टि.व्ही., संगणक इ. यामुळे 15 टक्के ऊर्जा बचत होते. ३. कार्यालयात व घरात सुर्यप्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करावा. ४. घरातील आतील भिंतींना व छताला फिकट रंग द्यावा. ५. फ्रिज मध्ये जास्त बर्फ साचु देऊ नका तसेच वारंवार दरवाजा उघडु नका. ६. वीजेच्या अती उच्च मागणी काळात म्हणजेच सकाळी ७ ते ११ व सायंकाळी ६ ते १० या वेळेत मोठ्या प्रमाणावर मोठ्या वीज उपकरणांचा वापर टाळावा. ७. वातानुकुलीन यंत्र (ए.सी.) पंख्यापेक्षा १५ पट जास्त ऊर्जा खर्च करते. ए.सी. चे तापमान २५ अंश से. एवढे ठेवावे. ८. प्रकाश योजनेसाठी ऊर्जा बचत करणारे एल.ई.डी. बल्ब व ट्युबचा वापर करावा त्यामुळे ८० टक्के ऊर्जा बचत होते. ९. बी.ई.ई.स्टार लेबल अथवा आय.एस.आय. प्रमाणित उपकरणांचा वापर करावा व त्याची नियमीत देखभाल करावी. शक्यतो सौर, पवन, बायोगॅस, बायोमास यासारख्या अपारंपरिक ऊर्जेवर आधारीत साधनांचा वापर करावा. १०. कमी अंतरासाठी वाहनांचा वापर टाळा, १ ते २ मजल्यासाठी लिफ्टचा वापर टाळावा.

# देशातील वाढती कर्करोगाची संख्या धक्का देणारी

आधुनिक केसरी

देशात कर्करोग रुग्णांची संख्या वाढत असून त्यातील ८ टक्के रुग्ण महाराष्ट्रात आहेत १०० पैकी १० ते १५ जणांना आनुवंशिकतेने कर्करोग होतो तर अन्य रुग्णांना बदलत्या जीवनशैलीने आजार होतो व्यायामाचा अभाव, प्रदूषण व पोषकमुल्य नसलेला आहार यामुळे कर्करोग होण्याची दाट शक्यता असते राष्ट्रीय कर्करोग नोंदणीनुसार २०१३ मध्ये महाराष्ट्रात ९७७५९ जणांना कर्करोग झाल्याचे निष्पन्न झाले होते २०२२ मध्ये हीच संख्या १२१७१७ वर गेली होती राज्यात रोज ३३३ जणांना कर्करोग होत असल्याची बातमी वाचण्यात आली येत्या काही दिवसात या संख्येमध्ये वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येते आहे इंडीयन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च व राष्ट्रीय कर्करोग नोंदणी



प्रकल्पानुसार २०२२ मध्ये राज्यात कर्करोगाचे रुग्ण १४.६१ लाख होते २०२५ मध्ये हेच प्रमाण १५.७ लाख होईल असे वर्तविण्यात येत आहे कर्करोग होवू नये म्हणून जनजागृतीची गरज असून याचे निदान लवकर होणे अपेक्षित आहे तसेच या आजारांवर संशोधन होणे आवश्यक असून तंबाखू नियंत्रण कार्यक्रम वेगाने राबविणे गरजेचे आहे कारण त्यामुळे कर्करोगाची होण्याची शक्यता वाढते मुख, फुफ्फुस, पोटाचा, बोन मॅरो, यकृताचा आदी प्रकारचा कर्करोग होतो तंबाखू खाल्याने ५० टक्के पुरुषांना तर २० टक्के महिलांना कर्करोग होत असल्याचे आढळले आहे त्यामुळे हि बाब महाराष्ट्रासाठी धक्कादायक असून निरामय आयुष्यासाठी सर्वांनी सतर्क राहणे कधीही हिताचे ठरणारं आहे !

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

# बावनकुळे जेव्हा सहकारी पदाधिकाऱ्यांचा पाहुणचार करतात



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**संघटनात्मक नेतृत्व करताना सहकारी तथा कार्यकत्र्यांची काळजी कशी करावी? एवढेच नव्हे तर प्रत्येकासोबत कौटुंबिक नाते कसे निर्माण करावेत? विस्कळित पडलेल्या वर्तमान राजकिय व्यवस्थेला आदर्श दाखवुन देत आहेत ते भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे. अतिथी देवो भव, निवासी येणारा प्रत्येक कार्यकर्ता आमच्यासाठी परमे·ारासारखा महत्वाचा असतो. ही हिंदु संस्कृती अनादिकाळापासून भाजपा परिवाराची चालत आलेली त्याचं अनुकरण करताना बावनकुळेंच्या बाबतीत प्रत्यक्ष आलेला अनुभव जेव्हा आम्ही कौटुंबिक कार्यक्रमासाठी भेटायला गेलो त्यावेळी निवासी बोलुन केलेले आदरातिथ्य पुढायांनी आदर्श घेण्यासारखं वाटलं.**

हिंदु धर्म हा रूढी, परंपरा, सांस्कृतिक मानवतेच्या धर्मानुसार चालतो. हाच विचार खया अर्थाने भाजपा पक्षात रूढ झालेला असुन संघ परिवार असेल किंवा भाजप परिवार अतिथी देवो भव ही कल्पना परस्पर नात्याचा धागा जोडणारी हे लपुन राहिलं नाही. आपआपसात कौटुंबिक संवाद असावा त्यातुन मने जुळली जातील आणि एक चांगला विचार पुढे येतो ही परंपरा आहे. पण दुर्दैवाने वर्तमान राजकिय व्यवस्थेत प्रत्येक व्यक्ती स्वतःभोवती फिरत असल्याने आपलेपणाचं नातं आणि भावना जपण्यासाठी कुणी वेळ देईना किंवा स्वार्थापुढे कुणाला काही सुचेना. त्याला अपवाद चंद्रशेखर बावनकुळे निश्चित म्हणावे लागतील.प्रदेश अध्यक्ष पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर या नेतृत्वाने उभ्या महाराष्ट्रात चांदा ते बांदा पायात भिंगरी घालुन संघटनात्मक प्रबळता कशी वाढेल? यावर विशेष भर दिला. हे करताना अगोदर कार्यकर्ता महत्वाचा, तोच आपला पक्ष संघटनेचा मुख्य आत्मा ही त्यांची भुमिका सर्वांनाच भावली जाते. वास्तविक पहाता आजकाल पदे आली की नशा वाढते. मग माणुसकी देखील बर्फासारखी विरगळुन जाते आणि मग भांडवलशाहीचा उपभोग घेताना चंगळवादाच्या समुद्रात कधी बुडुन जातो लक्षातही रहात नाही. पण बावनकुळेंनी मात्र जमिनीवरचा कार्यकर्ता लक्ष्य केंद्रित करून संघटनेला वेगळी दिशा देण्याचे काम जबाबदारी घेतल्यापासुन राज्यात करून दाखवलं. अनेक पक्षांचे प्रदेश अध्यक्ष आणि चंद्रशेखर बावनकुळे हे प्रदेश अध्यक्ष लोक आज तुलना करायला लागलेत. इतरांकडे पाहिलं की, गाडीच्या काचा काळा करत फिरणारे एव्हाना कार्यकत्र्यापासुन दुर रहाणारे आणि पद केवळ हार तुरे आणि टिव्हीसमोरच बोलण्यासाठी वापरणारे असे अनेक अध्यक्ष वर्तमान राजकिय व्यवस्थेत वेगवेगळ्या पक्षाचे पहायला मिळतात. त्या सर्वांला अपवाद बावनकुळे निश्चित ठरत आहेत. कार्यकत्र्याला जीव कसा लावावा? याचि देहि, याचि डोळा अनुभव घेतल्याने लिखाणाचा खटाटोप या ठिकाणी केला. सांगायचं हे आहे की, कालच्या सोमवारी आम्ही नागपूरात कोराडी येथे निवासी राहणारे पक्ष प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंना भेटण्यासाठी गेलो. निमित्त होते आमचे जेष्ठ बंधु माजी आ.आर.टी.देशमुख यांच्या चिरंजीवाच्या लग्न पत्रिकेची. रविवारी रात्री साहेबांना मॅसेज टाकला तदनंतर त्यांचा फोन आला. दुसया दिवशी सकाळी नऊची वेळ देवुन त्यांनी आम्हाला घरी बोलावले. ठरल्याप्रमाणे नागपूर शहरापासून जवळ असलेल्या कोराडी शहरात निवासस्थानी आम्ही जावुन पोहोचलो. आमच्या अगोदर नाही म्हटलं तरी 200 पेक्षा जास्त स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी भेटण्यासाठी येवुन ठेपलेले होते. आम्ही आल्याची कल्पना सेवकांच्या मार्फत त्यांच्या कानावर पडताच आम्हाला मानपान देवुन अगदी दुसया मजल्यावर असलेल्या प्रमुख बैठकीत बोलावले. काही सेकंदात स्वतः प्रदेश अध्यक्ष बैठकीत आले. नाश्ता



त्यांनी विचारला नाही. पण माझ्यासोबत तुम्हाला नाश्ता करायचा अगदी इत्थंभुत माहिती प्रवासाची आमच्याकडून घेतली. विविध प्रश्नांवर चर्चाही केली. चहापान स्वागत केल्यानंतर पाहुणचार झाला. सांगायचं तात्पर्य म्हणजे जगाच्या पाठीवर मोठा पक्षाचे प्रदेश अध्यक्ष असलेला माणुस एका सामान्य कार्यकत्र्याला आपल्याकडे आल्यानंतर आस्थेवाईक चौकशी करून कौटुंबिक मानाचे स्थान मिळवुन देतो तेव्हा अतिथी देवो भव या भुमिकेत त्यांचा चेहरा पहायला मिळतो. समोर दोन-चारशे कार्यकर्ते बसलेले असताना केवळ आमच्यासाठी दिलेली वेळ लक्षात ठेवुन आम्हाला जो वेळ दिला त्याचे कौतुक माजी आ.आर.टी.देशमुख यांनी देखील केलं. याचे साक्षीदार माध्यम प्रमुख नवनाथजी बन आणि रघुनाथजी पांडे ज्यांची एण्ट्री आमची बैठक सुरू असताना झाली होती. अलीकडे प्रदेश अध्यक्ष संघटनात्मक कामं करताना जुन्या नव्या कार्यकत्र्यांना सोबत घेवुन कसं काम करतात? संघ परिवारातील कार्यकत्र्यांना न्याय कसा मिळवुन देतात? याचे देखील त्यांच्या बाबतीत सर्वत्र कौतुक होतच आहे. पण अतिथी देवो भव ही हिंदु धर्माची संस्कृती पुढे घेवुन जाण्यासाठी त्यांच्या एकुण भुमिकेत जो आदर्श दिसुन आला. तो खरंच राजकिय पुढायांनी घेण्यासारखाच म्हणावा लागेल. शेवटी कार्यकत्र्याला देखील सन्मान दिला, जीव लावला तर नेतृत्वावर तो मनातुन प्रेम करतो. आज भाजपा जगाच्या पाठीवर देशात सर्व ठिकाणी प्रबळ सत्ताधारी दिसत असला तरी जेव्हा शुन्य होतं त्या काळात चळवळीच्या माध्यमातुन संघर्षाच्या वाटेतुन पक्ष चालवणारे कार्यकर्ता आणि नेता यांच्यातलं नातं आपलेपणाचं कसं असतं? हे कृतीतुन दिसायचं. स्व.गोपीनाथराव मुंडे असेच एक नेते होते ज्यांच्याकडून कार्यकर्ता आणि प्रेम करणाया प्रत्येकाची रेखीव,देखीव एव्हाना आस्थेवाईक आपलेपणा निर्माण करून जायचे. तीच भुमिका प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्यात तंतोतंत पहायला मिळुन येते हे मात्र नक्की. विशेष म्हणजे एवढा मोठा पदावर असताना वेगळा आविर्भाव त्यांच्या बॉडी लँग्वेजमध्ये कधीच नसतो जो आम्ही कौटुंबिक बैठकीत बसल्यानंतर अनुभवला. तुम्ही परत कधी जाणार? नव्हे तर रात्री स्नेह भोजन करण्यासाठी घरीच या हे सांगायला ते विसरले नाहीत.असो. प्रत्यक्ष अनुभवाचं उदाहरण विषद करण्यामागे हेतु एवढाच आहे की वर्तमान राजकारणात व्यक्ती श्रेष्ठ दिवस आलेले असताना असा एखादा नेता जो सामान्य कार्यकत्र्यावर मनातुन प्रेम करतो. सहकारी पदाधिकायांना आपलेपणातुन जीव लावतो हे नसे थोडके.

# व्यक्तिमत्त्व आणि आरोग्य



सुरेश चौधरी
संपर्क क्र. 7020253948

आधुनिक केसरी

**उत्तम व्यक्तिमत्त्वाचा माणूस असा शब्द कोणी उच्चारला, तर आपल्या डोळ्यासमोर एक उंचापुरा, सुंदर, गोरापान, आणि कसलेल्या शरीराचा मनुष्य उभा राहतो. पण अशा माणसाचे व्यक्तिमत्त्व हे सुंदर आकर्षक असले तरीही ते उत्तम शारीरिक स्वरूपाचे व्यक्तिमत्त्व असते !व्यक्तिमत्त्वाचे विविध प्रकार असतात. संतापी व्यक्तिमत्त्व, चिडचिडे व्यक्तिमत्त्व, मनात एक, ओठात एक, असे व्यक्तिमत्त्व, स्पष्ट मत व्यक्त करणारे व्यक्तिमत्त्व, वगैरे! व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आपल्या आरोग्यावर हमखास पडत असतो. चांगले व्यक्तिमत्त्व म्हणजे मानसिक दृष्ट्या उत्तम असलेले व्यक्तिमत्त्व. अशा व्यक्तिमत्वाचे मोजमाप त्याच्या शरीरातून, सौंदर्यातून गोऱ्या, सावळ्या रंगातून, बुटक्या उंच, जाड्या शरीराच्या ठेवणीतून करता येत नाही.**

तर त्याच्या स्वभावाच्या परीक्षणातून त्याच्या चांगल्या व्यक्तिमत्त्वाची पारख करता येते. कामाचा ताण वाढल्यास १) आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातून इतरांवर थोडे काम सोपवता येते. २) हे काम करणे आवश्यक आहे हे चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे लोक सदैव मान्य करतात आणि आवडीने गाणीं गुणगुणत एक एक काम संपवतात, याने थकवा जाणवणार नाही. संताप चिडचिड करीत काम केल्यास लवकरच थकवा येतो. आणि अर्थातच त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर निश्चितच होतो. आर्थिक परिस्थितीचा किंवा लांबलेल्या आजारपणाचा प्रसंग उद्धवल्यास आपल्याच इतर गरीब मित्रांचा किंवा समाजाचा विचार केल्यास असे लक्षात येईल की आपल्यापेक्षाही लोक प्रचंड ताण-तणावाखाली लोक जगत आहेत! निद्रानाशाचा ताण असल्यास असेही लोक जगात भरपूर सापडतील की झोपेच्या गोळ्या घेऊन सुद्धा लोक रात्र रात्र तळमळत राहतात निद्रानाशाचा विकार तसा खरोखरीच त्रासदायकच असतो! व त्यामुळे अंथरुणावर पडलेल्या व्यक्तीस रात्र नकोशी होते ! तरीही चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे लोक या गोष्टी मान्य करतात आणि सकारात्मक विचाराने आनंदी राहतात. प्रसंगाशी यशस्वी संघर्ष करीत ते आनंदी राहतात. समजा निद्रानाशामुळे आपली केवळ चार तास झोप झाली, तीन तास झोप झाली, फक्त दोन तासच झोप झाली, तर इथंही तुमचं व्यक्तिमत्त्व तुम्हाला सकारात्मक विचाराने, निद्रानाशाचा त्रास वाचवू शकतो. लक्षात ठेवा ,जी तुमची झोप झालेली असते, ती एक तास असो वा चार तास असो, ती खरोखर, अगदी, आनंद देणारी आणि स्वस्थ व शांततेचीच झोप असते! तेव्हा उठल्याबरोबर एक जोरदार आळस द्या आणि त्या शांत झोपेची कृतज्ञता व्यक्त करीत मनोमन म्हणा की वा$$ काय छान झोप लागली होती फर्स्टक्लास ! अशा व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्ती नेहमीच हसतमुख असतात, दुसऱ्यांच्या सुखदुःखात नेहमीच सहभागी होणाऱ्या असतात, निःस्वार्थपणे जमेल तशी इतरांना तनमनधनाने मदत करणाऱ्या असतात !त्यांचे व्यक्तिमत्त्व जबरदस्त पारदर्शक असते ! त्यामुळे अशा व्यक्तभोवती विविध स्वभावाच्या व्यक्ती नेहमीच गर्दी करतात व त्यांचा सहवास सदैव लाभावा याच्यासाठी ते प्रयत्नशील असतात. त्यांच्यावर प्रेम करणारी मंडळी अशा चांगल्या व्यक्तीबद्दल अपशब्द अपप्रचार किंवा वाईट भावना कधीही सहन करीत नाहीत !हे निश्चितच समजावे, की अशा व्यक्ती दीर्घायुषी असतात ,कायमस्वरूपी निरोगी असतात, समाजात अशा विविध व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्ती आढळून येतात !आपल्या ठरलेल्या मनाविरुद्ध कुणी बोलल्यास त्याच्याशी संघर्ष करणे, अपमान करणे, वगैरे प्रकार या व्यक्ती करतात. दुसऱ्या एखाद्याचं व्यक्तिमत्त्व असं असतं की त्यांच्या मनाविरुद्ध कोणी बोलल्यास हसतमुख राहून जरी वर वर स्मित करून मान्यता दाखवीत असतील, तरीही मनोमन त्यांना आतून खूपच संताप आलेला असतो! त्यामुळे या माणसाला जीवनातून कसे उठावावे, याच्या योजना ते सदैव साकारीत असतात. त्यामुळे काही व्यक्ती मनाविरुद्ध बोलण्या-याचा खूप संताप करतात पण



थोड्या वेळाने विसरूनही जातात! अनेक व्यक्ती त्यांच्यावर कामाची जबाबदारी प्रसंगी वाढल्यास व प्रत्येक कामाचा "आत्ताच्या आत्ता झालेच पाहिजे" अशा दबावाने खूप चिडचिडे होतात ! असा प्रकार ऑफिसमध्ये कंपनीमध्ये साहेब लोकांकडून तर घरी देखील पतीकडून, मुलांकडून ,बायको कडून ,बायकोवर, आईवर असे प्रकार होत असतात !किंवा सासू कडून सुनेवर अथवा सुनेकडून सासूवर होत असतात! अशामुळे सामाजिक किंवा कौटुंबिक व्यवस्थेतील मानसिक शांतता नष्ट होत असते व त्याचा दुष्परिणाम नकळतच आपल्या आरोग्यावर व पर्यायाने शरीरावर होत असतो! हे असे का होते याचे मनस्वी चिंतन केले तर आपल्या लक्षात येईल की या अशांततेमुळे होणाऱ्या अस्वस्थ प्रकृतीस आम्हीच जबाबदार असतो ! अशा परिस्थितीत यशस्वी संघर्ष करून आम्हाला शांत आणि स्वस्थ राहणे जमूं शकते !एकदा खालील तपशील पाहून त्यावर चिंतन करावे! १) ए फॉर ॲम्बिसिअस हंगर अँकसिएटी, म्हणजे महत्त्वाकांक्षा, संताप, चिंता, हे सर्व टाळणे ! आवश्यक आहे संतापावर नियंत्रण आवश्यक आहे २) बी फॉर ब्रेन, बिझी, बॉटल, म्हणजे मेंदूवर ताबा मिळवणे, उद्योगी राहणे, औषध दारूवर नियंत्रण ठेवणे किंवा व्यसन बंद करणे ३) C फॉर सिगारेट, कम्युनिकेशन, म्हणजे धूम्रपान ,संवाद वगैरे याचा अर्थ धूम्रपान बंद करणे संवाद साधणे, ४) डी फॉर डॉक्टर, डाएट म्हणजे डॉक्टरचा योग्य वेळी सल्ला घेणे आहारावर संतुलन ठेवणे ! ५) इ फॉर एंटरटेनमेंट, एक्सरसाइज मनोरंजन व्यायाम वगैरे! अर्थ मनोरंजन! मनोरंजनात वेळ खर्च करा, भरपूर हास्यविनोद करा, आपल्या ,इतरांच्या आAनंदात सहभागी व्हा, रोज थोडा व्यायाम करा! ई फॉर इगो! अहंकार कमी करा! ७) फॉरगेट. अप्रिय घटना विसरा, फरगिव्ह! क्षमाशील रहा! ८/जी फॉर गॉड! गुडनेस! देवावर कुठेही श्रद्धा ठेवा !आणि आपला सहवास आपल्या सहवासाची प्रत्येकाला इच्छा होईल असे कार्य करा ! ९) एच फॉर हॅपी होम ! हेल्दी लाईफ !!म्हणजे आनंदी, कुटुंब वत्सल रहा, आरोग्यदायी रहा! चिंतन वअवलोकन करा ! अशा आराखड्यामुळे आम्ही जर आमची जीवनशैली आनंदी ठेवली तर आम्ही जीवनातला सर्व आनंद उपभोगू शकू !निरोगी राहू !दीर्घायुषी होऊ! म्हणून आपण दिसायला कसे आहोत आपले शरीर कसे आहे, आपलं सौंदर्य कसे आहे ,आपण प्रमाणात पेक्षा लठ्ठ/ काटकुळे/ उंच/ बुटके आहोत काय ,आपला चेहरा सुंदर आहे काय, यावर चिंतन करीत बसण्यापेक्षा मी इतरांशी मनस्वी प्रेमाने वागतो का, हसत मुखाने बोलतो का ,इतरांच्या गुणवत्तेची मनःपूर्वक कौतुक करतो काय ,इतरांच्या अडीअडचणीत मी तनमनधनाने मदत करतो का ,यावर चिंतन करून तशी वागणूक सदैव ठेवली तर मला आयुष्यभर निरोगी व दीर्घायुषी राहता येईल! मला माहित आहे की किरकोळ संतापाने रक्तदाब वाढतो. वाढलेल्या संतापाने रक्तदाब अधिक वाढतो. त्याचा अतिरेक झाल्यास शरीर थरथर कापू लागते दुष्परिणाम, हृदयावर होऊन काहीही होऊ शकते! मनात अयोग्य विचारावर लक्ष केंद्रित करून ते ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न केल्यास परंतु सिद्ध न झाल्यास निद्रानाशाचा विकार होतो आणि सिद्ध झाल्यास आसुरी आनंद तात्पुरत्या स्वरूपात होत असला, तरी अंतिम समयी आपल्यालाच याची उत्तरे देता येत नाही व शेवटी शांत शांतपणे आनंदी असा मृत्यू येत नाही !म्हणून आपल्याला आपल्या व्यक्तिमत्त्वावरच चिंतन करून आनंदी जीवनाचा मार्ग सापडू शकतो.

# गुळवे सरांचे लेख वाचकांसाठी एक अनमोल ठेवा

आधुनिक केसरी

जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी ता.अहमदपूर या माझ्या गावातील माध्यमिक शाळेत बबनराव गुळवे गुरुजी हे गणित विषयाचे तज्ज्ञ व जाणकार शिक्षक आणि कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.त्यांच्या हाताखाली त्याचा विद्यार्थी म्हणून शिकण्याचे भाग्य मला लाभले. ते गणित विषयाचे गाढे अभ्यासक आहेत. दहावीला असताना मला एसएससी बोर्ड परीक्षेत त्यांच्या गणित विषयात सर्वाधिक गुण घेऊन प्रथम येण्याचा मान मिळाला. गुळवे सर गणित विषयाचे तज्ञ व विद्यार्थी प्रिय शिक्षक तर आहेतच. पण ते एक नामांकित लेखक व कवी म्हणूनही प्रसिद्ध आहेत.ते दिवसभर शाळा करतात व रात्रभर लिखाण करतात. त्यांना वाचन व लेखनाचा छंद आहे.त्यांचे दररोज विविध नामांकित वर्तमानपत्रात लेख प्रकाशित होत असतात.मी एक त्यांचा विद्यार्थी व नियमित साहित्य वाचक असल्यामूळे मला त्यांच्याबद्दल बराच काही अनुभव आहे.तो मी या लेखरुपात लिहीत आहे. मी माध्यमिक वर्गात शिकायला असताना गुळवे सर मला गणित विषयाचे तज्ञ शिक्षक म्हणून लाभले आणि मला त्यांनी गणित विषयाचे सखोल ज्ञान दिले. माझा अवघड गणित विषय सोपा व पक्का केला. म्हणूनच की,काय दहावी बोर्ड परीक्षेत मला गणित विषयात सर्वाधिक 92 गुण मिळाले.मी आजही त्यांनी दिलेल्या गणितीय सखोल ज्ञानाचा उपयोग व्यवहारिक जीवनात करत आहे.याचे सारे श्रेय गुळवे सरांना जाते. ते अगोदर गणित विषयाचे तज्ज्ञ शिक्षक आहेत म्हणून मला एवढेच माहित होते.पण ते एक नामांकित लेखक व कवी आहेत म्हणून मला माहित नव्हते. मी दहावीला असताना अचानक वाचनालयात गेलो होतो.तेव्हा नकळत एकमत पेपर माझ्या हातात पडला होता आणि नेमकाच गुळवे सरांचा लेख संपादकीय पानावर मला दिसला आणि मी तो लेख मन लावून वाचला आणि माझ्या मनाला तो खूप भावला.तो लेख वाचून मी मंत्रमुग्ध झालो. तेव्हापासून मला माहित झाले की,गुळवे सर एक दर्जेदार लेखक आहेत व त्यांचे दररोज वर्तमानपत्रात लेख प्रकाशित होतात आणि तेव्हापासून मी मनात पक्का निश्चय केला की, आजपासून दररोज वाचनालयात जाऊन सरांचे लेख वाचायचे. गुळवे सरांचे लेख म्हणजे साहित्य प्रेमींसाठी एक अनमोल ठेवाच आहे. हे मला कळाले. त्यांचे विविध वर्तमानपत्रातील लेख वाचण्याची मला सवयच जडली. खंडाळीच्या खंडेश्वरी वाचनालयात पहिली हजेरी मी लावायचो व गुळवे सरांचे लेख वाचायचो. पेपरवर गुळवे सरांचा लेख दिसला की,माझ्या मनाला समाधान वाटायचे व मन एकदम प्रफुल्लीत व्हायचे व मनाला एक वेगळीच उर्जा मिळायची. एकदा का गुळवे सरांच्या लेखाच्या आहारी गेलेला माणूस त्यांच्या लेखाचा नियमित वाचक होतो. एवढे मी अनुभवाने सांगू शकतो. म्हणतात ना आजचा वाचक उद्याचा लेखक असतो.

-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे

# एकच मिशन जुनी पेन्शन

आधुनिक केसरी

**दिनांक मंगळवार १२ डिसेंबर २३ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या पेन्शन जनक्रांती महामोर्चा मध्ये महाराष्ट्रातील लाखो कर्मचारी या महामोर्चा मध्ये जुनी पेन्शन लागू करावी या एकमेव मागणीसाठी सहभागी झाले होते, या वेळी महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. जो पक्ष कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करेल त्याच पक्षाला हे कर्मचारी आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत मतदान करतील अशी भूमिका उपस्थित सर्व आंदोलकांनी घेतली. २००५ नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना बंद करून अंशदायी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे.**

सदरील योजना ही अन्यायकारक असून ही योजना शेअर बाजाराशी निगडित असल्याने या योजनेतून निवृत्ती पश्चात कोणतीच निश्चित हमी कर्मचाऱ्यांना मिळत नाहीत त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये या योजने बाबत प्रचंड नाराजी आहे.



मागील काही वर्षापासून जुनी पेन्शन हा विषय संपूर्ण देशात गाजत असून आतापर्यंत राजस्थान, पंजाब, छत्तीसगढ, झारखंड आणि नुकतीच हिमाचल प्रदेशात नवीन पेन्शन योजना बंद करून जुनी पेन्शन योजना परत सुरू करण्यात आली आहे, त्यामुळे महाराष्ट्रातील कर्मचारी देखील जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी या मागणीसाठी हे कर्मचारी विविध मार्गाने मोर्चे, आंदोलने, काम बंद आंदोलनातून सरकारवर दबाव वाढवत आहेत, मागील काही आंदोलनातून मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना जुनी पेन्शन योजना व सेवा उपदान या मागण्या पूर्ण झाल्या आहेत आता सर्व कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्ती वेतन मिळावे या मागणीसाठी कर्मचारी आंदोलनाच्या भूमिकेवर ठाम आहेत.

मार्च २०२२ मध्ये मध्यवर्ती कर्मचारी संघटना व इतर सर्व कर्मचारी संघटना बेमुदत संपावर गेल्यानंतर शासनाने जुनी पेन्शन योजना लागू करण्यात साठी अभ्यास गट स्थापन केला होता या अभ्यास गटाने त्यांचा अहवाल शासनाला नुकताच सुपूर्त केला आहे या अहवालात काय बाबी नमूद करण्यात आल्या आहेत या बाबत संपूर्ण महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांत उत्सुकता आहे.

एका बाजूला सरकार अभ्यासगट स्थापन करून विविध प्रकारची आश्वासने व मध्यम मार्ग काढण्याचा विचार करत असताना कर्मचारी मात्र कुठल्याही तडजोडी न स्वीकारता जुनीच पेन्शन मिळावी या मागणीवर ठाम आहेत...

१२ जानेवारी रोजी पार पडलेल्या या पेन्शन जनक्रांती महामोर्चा मध्ये सत्ता पक्ष तसेच विरोधी पक्ष नेते यांनी उपस्थित राहून आगामी काळात हे कर्मचारी आपल्याच बाजूने राहतील या साठी आश्वासनाची जंत्रीच सादर केली..

पेन्शन जनक्रांती महामोर्चा मध्ये महाराष्ट्र राज्य प्राध्यापक जुनी पेन्शन हक्क कृती समितीच्या वतीने सक्रिय सहभाग घेतला होता या वेळीं कृती समिती चे राज्य अध्यक्ष प्रा डॉ मारोती तेगंमपुरे राज्य सचिव प्रा डॉ अमोल लाटे, राज्य समन्वयक प्रा डॉ सोमनाथ वाघमारे तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य प्रा डॉ ललित कुमार शनवारे, प्रा रमेश बहादुरे, प्रा.डॉ. उमाकांत राठोड, प्रा डॉ चारुदत्त बेले, प्रा अरविंद पाटील, प्रा डॉ अतुल चौरपगार, प्रा डॉ मनोज गिरम, प्रा डॉ शिवाजी भोसले, प्रा डॉ पुरुषोत्तम चाटे,प्रा डॉ पुरुषोत्तम जुन्ने, प्रा डॉ आत्माराम आंधळे, प्रा डॉ विठ्ठल बोरकर, प्रा डॉ नितीन रोडे, प्रा. डॉ. दिलिप फोके, प्रा डॉ अरविंद पाटील आदी महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

**प्रा. डॉ. सोमनाथ वाघमारे**
राज्य समन्वयक, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक जुनी पेन्शन हक्क कृती समिती

# रेणावीत मराठी साहित्य संमेलनाच्या फुलोराचा जागर



सदानंद माळी,
कडेगाव

आधुनिक केसरी

**रेणावी.....सांगली जिल्ह्यातील सुप्रसिद्ध असलेलं रेवणसिद्द मंदिर व संपूर्ण शाहाकारी असलेल्या गावानं आपलं गावपण मोठ्या मायममतेने जपलं आहे. रेणावी गावच्या या गावपणात साहित्य, लेखक आणि समाजाच्या समन्वयाचा बंध निर्माण करून गेली 21 वर्ष साहित्य संमेलनाचा जागर घडवला जात आहे. त्याच्यामाध्यमातून समाजपरिवर्तनाची, तरुणांमध्ये सकारात्मक विचाराची पेरणी केली जात आहेत. साहित्यावरची आत्मियता आणि रसिकता जपत श्रीमती शहाबाई यादव सांस्कृतिक, साहित्य, कला विकास मंचच्या वतीने साहित्य संमेलन आणि वाचन चळवळ उभी केली आहे.**

या संमेलनात ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेने व साहित्यातील अतिव प्रेमाने एकत्र येऊन संमेलनाची साहित्यवारी आणि साहित्यिक दिंडी नेटाने पुढे नेत आहेत. साहित्य प्रेमातून आईच्या स्मृति जपण्यासाठी श्रीमती शहाबाई यादवाचे सुपुत्र पद्माकर यादव व अमृतवेल मीडियाचे सर्वेसर्वा रेणावीचे सुपुत्र धर्मेंद्र पवार हे या साहित्य संमेलनाच्या दिंडीचे पाईक आहेत. गावगाड्यातील या संमेलनातून सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. प्रती बहिणाबाई अशी ओळख बनलेल्या, निरक्षर असूनही समाजातील ज्वलंत प्रश्नावर साध्या पण मर्मभेदी भाषेत शहाबाई काकू काव्य रचायच्या आणि पश्चिम महाराष्ट्रातील विविध साहित्य संमेलनात सादरीकरण करुन रसिक श्रोत्यांना अचंबित करायच्या. त्यांच्या सामाज जागृती विचाराचा वसा आणि वारसा घेऊन रेणावी येथे त्याच्या नांवाने गेली 21वर्ष साहित्याचा जागर सुरु आहे. या संमेलनात गेली दहा वर्षापेक्षा जास्त 'बाल साहित्य मंच' सुरू आहे. दिवसेंदिवस या बालमंचला बालचमूकडून उत्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. बालमंचच्यानेच संमेलनाचे प्रथम सत्र सुरु होते. या बालमंचाच आरंभ किशोर मासिकाचे संपादक किरण केंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी बालमंच्याला 40 पेक्षा जास्त बालचमूने आपल्या सादरीकरणाद्वारे कविता सादर केल्या. यातील काहींनी स्वतः लिहिलेल्या कविता सादर केला. संभाषण चातुर्यसह अभियान करत आपापल्या सादरीकरणाचा आविष्कार पाहून रसिकजन मंत्रमुग्ध झाले. सादरीकरण नंतर त्यांच्या भावछटा व चेहऱ्याचा नूर काही औरच होता. आपण काहीतरी जिंकून आलो या अविर्भावात त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज झळकत होते. आणि हेच या संमेलनाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. या मुलांना मार्गदर्शन करताना बालसाहित्य मंचाचे अध्यक्ष सुनिल दबडे म्हणाले की आजकाल घरातलं घरपण हरवतं चाललं आहे.



वडील लँपटाँपवर, आई घरातल्या टीव्ही पुढं दंग आहे. दादा व ताई मोबाईलच्या सोशल मीडियावर हरवलेली असतात. हे सर्व चित्र हा बालचमू पाहत असतोच. त्यामुळे त्यांचे बालपण, त्याचा मुक्तपणा हरवतं चाललाय. मोबाईलच्या विश्वरूपी मायाजालातून सुटका करण्यासाठी बालचमूना वाचन संस्कृतीकडे वळविण्यासाठी असे उपक्रम आवश्यक आहेत. यासाठी असे बाल साहित्य मंच गावोगावी सुरू होणे गरजेचे आहे. बालचमूना चरित्रात्मक पुस्तके दिली तरच वाचनातूनच त्यांचे चरित्र घडेल. चरित्रातून चारित्र घडले तरच समाज व देशाचे चारीत्र घडेल. अशा उपक्रमामुळे समाजात परीवर्तन होऊन गाव, समाज, राज्य, देश हा व देशाची पिढी संस्कारक्षम बनेल.

दुसऱ्या सत्रात संमेलनाचा उद्घाटन सोहळा शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. पाटील म्हणाल्या की वाचनामुळे मी प्रशासकीय क्षेत्राकडे वळले. पुस्तक वाचनामुळे माणसांचे आयुष्य बदलते.डाँ कलाम यांच्या अग्निपंख पुस्तकांनी माझे आयुष्य बदलले आहे. ग्रामीण भागात होत असलेल्या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी भाषा समृद्ध करण्याचे काम होत आहे. ही बाब अतिशय उल्लेखनीय अशी आहे. यावेळी 'श्रीमती शहाबाई यादव साहित्य गौरव' पुरस्काराने लेखक अरविंद पुजारी, कवयित्री मनीषा पाटील, मंदाकिनी सपकाळ तर अमृतवेल ग्रामविकास प्रबोधिनी पुरस्कृत 'कविवर्य चंद्रकांत देशमुखे साहित्य सेवा' पुरस्काराने प्रा. रामदास नाईकनवरे व कवी रमजान मुल्ला यांना सन्मानित करण्यात आले. संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी प्रा. प्रदिप पाटील हे होते. नव्वदनंतरच्या मराठी साहित्यातील व्यासंगी शब्दप्रभुत्व, साहित्याशी आत्मसंवाद व साहित्यिक व साहित्याच्या अंतरीला जाणारे मराठी भाषेवर प्रभुत्व असलेले साहित्यिक म्हणून त्याची ओळख साहित्य जगतात आहे. अध्यक्षपदावरुन बोलताना प्रा. पाटील म्हणाले की अभिजात साहित्यातील परंपरेच्या मुळाशी ग्रामीण भागाच आहे. आपण ज्या परिस्थितीतून आलो त्याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. लेखकाने साहित्यात आपली वेगळी शैली जपावी. नाविन्यपूर्ण शैली व वेगळेपणाद्वारे सर्जनशीलता मांडत साहित्य निर्मिती करावी. समाजातील विविध प्रश्नावरील वर्तमानाला भिडणारे लेखन साहित्यामध्ये येणे ही आजच्या काळाची गरज आहे. तरच ही साहित्य निर्मिती कलावंतांची कृतीशीलता होऊ शकते. हीच कलाकृती अत्यंत उत्कृष्ट कलाकृती ठरू शकते.

तिसऱ्या सत्रात नागठाणे येथील कवी रमजान मुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले. मुल्ला यांची प्रतिथयश कवी म्हणून महाराष्ट्रभर ओळख आहे. एशियन पोएट्रीसाठी अठ्ठेचाळीस देशात अभ्यासासाठी निवडलेल्या भारतातील पन्नास कवीच्यामध्ये त्यांचा समावेश आहे यात त्यांच्या दोन कवितांचा समावेश झाला आहे. 'काळजातल्या कविता' हा मंचीय कार्यक्रमाचे दीड हजाराच्यावर प्रयोग महाराष्ट्रात प्रयोग झाले आहेत. 'अस्वस्थ काळरात्रीचे दृष्टांत' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. कवीसंमेलन अध्यक्षपदावरुन बोलताना रमजान मुल्ला म्हणाले की माणसाच्या हृदयाला भिडणारी कविता असली पाहिजे. कविता ही एक विचारानी पुढे घेवून जाणारी कृती आहे. कविता ही माणसाच्या मनामध्ये कृतीशील विचार रुजवणारी असली पाहिजे. समाजामध्ये क्रांतीची बिजे रुजवून समाज परीवर्तन करणारी असावी. क्रांतीची भाषा लिहीणारी कविता साहित्यिक, कवीनी लिहिणे आज गरजेचे आहे. मुल्ला कवितेत म्हणतात की 'अंतरातल्या किंकाळीने कबीर झालो आहे. मला वाटते मी तुकोबा कबीर झालो आहे. भस्म व्हायचेच उरले आहे, बुक्का झालो, गुलाल झालो, फकीर झालो आहे'. या कविसंमेलनात सुहासिनी पाटील, आंनद हरी, विनायक कुलकर्णी, यशवंत चव्हाण, रोशनकुमार पिल्ले, अशोक पवार, मनिषा पाटील, शांतीनाथ मांगले, रामदास नाईकनवरे, सदानंद माळी, अस्मिता इनामदार, डॉ. मानसी जगदाळे, संजिवनी कुलकर्णी याच्यासह अनेक कवींनी कविता सादर करुन रसिकाची वाहवा मिळवली. कवीसंमेलनाचे सूत्रसंचलन गझलकार सुधाकर इनामदार यांनी अत्यंत उत्कृष्टपणेकेले. या संपूर्ण संमेलनाचे सूत्रसंचलन पत्रकार दिपक पवार यांनी केले. दुसऱ्या सत्रानंतर संमेलनाला आलेल्या साहित्यप्रेमीना भरलेलं वागं, चपाती, वरण,भात, गोडशिराचा साहित्यिक विचाराबरोबर भोजनाचाही आस्वाद दिला. या संमेलनाचे आयोजक मंचाचे अध्यक्ष जगन्नाथ यादव उपाध्यक्ष अजय पाटील, सचिव धर्मैद पवार, खजिनदार पद्माकर यादव यांनी नेटके संयोजन करुन आयोजनात कुठलीही कसूर ठेवली नाही. क्रांती नेहमी शस्त्रानीच होते असे नाही तर ती अक्षरोत्सवानेही होत असते हे या संमेलनाच्या विचारमंचावरुन सिद्ध झाले आहे.... असा हा रेणावी येथील बहरेल्या मराठी साहित्याच्या फुलोराच्या रसास्वादसहच्या आस्वादाचा अनुभव साहित्य प्रेमी घेत पुढील वर्षीच्या मराठी साहित्य जागर प्रतिक्षेतेची वाट पहात आपआपल्या घरट्याकडे परतले.

# वडेपुरी शिवारातील आखाड्याला लागलेल्या आगीत कपाशीसह कोंबड्या खाक

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** तालुक्यातील वडेपुरी शिवारातील आखाड्याला आग लागून संसारोपयोगी साहित्यासह शेतातील साठवण करून ठेवलेला अंदाजे तीन ते चार क्विंटल कापूस व १७ कोंबड्या आगीत खाक झाल्याची घटना दि. ५ डिसेंबर रोजी मध्यरात्री घडली.

वडेपुरी येथील अल्पभूधारक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल शेतकरी बालाजी रामराव दळवे यांनी शेतात राहण्यासाठी आखाडा अर्थात तात्पुरते राहण्यासाठी घर केले असून त्यात शेती अवजारे, संसार उपयोगी साहित्य, शेतीतील उत्पादित धान्य व इतर माल साठवण्यात येतो. तसेच तेथे शेती पूरक गावरान कुक्कुट (मुक्त) पालन करण्यात आले आहे. दि. ५ रोजी मध्यरात्री अचानक आग लागून त्यात गृहपयोगी साहित्य, तीन ते चार क्विंटल कापूस, शेती अवजारे आणि कोंबड्या तसेच कोंबडीचे पिल्ले जळून खाक झाले. त्यामध्ये जवळपास ३५ हजाराहून अधिकचे नुकसान झाले. सदरील नुकसानीचे तलाठी व कृषी सहाय्यक यांनी पाहणी करून पंचनामा केला असून अहवाल संबंधित कार्यालयास सादर केला असल्याची माहिती देण्यात आली.

# १४ कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील चार विविध विकास कामाचे आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते रविवारी (ता.१०) उद्घाटन करण्यात आले. श्री बागडे यांच्या प्रयत्नाने या विकास कामासाठी सुमारे १४ कोटी रुपये मंजूर झाले आहे.

फुलंब्री तालुक्यात लहाण्याची वाडी येथे ६ किमी रस्त्यासाठी सहा कोटी रुपये मंजूर झाले तर पानवडी रस्त्यावरील फुलमस्ता नदीवरील फुलासाठी एक कोटी ७५ लाख तसेच जिल्हा महामार्ग म्हसला रस्त्यासाठी एक कोटी रुपये तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ ते वाहेगाव चार किलोमीटर रस्त्यासाठी तीन कोटी ६५ लाख मंजूर झाले, अशा एकूण विविध विकास कामांसाठी सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

भूमिपूजनप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, जिल्हा सरचिटणीस ऐश्वर्या गाडेकर, भाजपचे तालुकाध्यक्ष सांडू जाधव, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सर्जेराव मेटे, बाजार समितीचे संचालक शिवाजी पाथ्रीकर, भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ, बाळू तांदळे, प्रशांत नागरे, कृष्णा सोटम, विलास उबाळे, डॉ. गोपाल वाघ, राजेंद्र नागरे, मंगलाताई वाहेगावकर, गंगाताई साठे, समाधान नवले, अभिषेक गाडेकर, सूचित बोरसे, संजय त्रिभुवन, सविता नवले, प्रभाकर सोटम, सुरेश बोरुडे, पंडित नागरे, गजानन नागरे आदींची उपस्थित होती.

# युवा मोर्चा अध्यक्षपदी मुंकुंदा गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** मोलखेडा येथील मुंकुंदा गायकवाड यांची भाजपा युवा मोर्चा सोयगाव तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. कार्यकारिणी सोयगाव तालुका अध्यक्ष बद्रीभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली हि निवड जाहीर करण्यात आली आहे. या निवडी चे केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, आमदार हरिभाऊ बागडे, सांडू पाटील लोखंडे, इद्रीस मुलतानी, प्रभाकर पालोदकर, सुभाष शिरसाट, सुरेश बनकर, माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पा काळे, ज्ञानेश्वर मोठे, सुनिल मिरकर, भारतीय जनता पार्टी सोयगाव तालुका अध्यक्ष बद्रीभाऊ राठोड, शिवाजी बुढाळ मा. जिल्हा परिषद सदस्य, उत्तम चव्हाण जिल्हा चिटणीस जयप्रकाश चव्हाण, प्रदीप चव्हाण तालुका अध्यक्ष, गणेश लोखंडे, माजी सरपंच मोरसिंग चव्हाण, नगराध्यक्ष कैलास काळे, माजी सरपंच वसंत बनकर, नगरसेवक आदींनी युवा मोर्चा तालुका अध्यक्ष मुंकुंदा गायकवाड यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

# हृदयाचे व्हॉल्व निकामी झालेल्या तरुणासाठी मुनगंटीवार ठरले देवदूत

## मुंबईतील ब्रीच कँडी इस्पितळात यशस्वी शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** अंबोरे कुटुंबाचा भंगार विक्रीचा व्यवसाय. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची. अशात २२ वर्षीय मुलगा तरुण आजारी पडला. त्याच्या हृदयाचे दोन्ही व्हॉल्व निकामी झाले. हातात पैसा नाही आणि कुटुंबाचं भविष्य असलेला तरुणही आजारी. अशा परिस्थितीत विवंचनेत सापडलेल्या पालकांनी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे धाव घेतली. संकटात सापडलेल्या आईवडिलांची अवस्था मुनगंटीवार यांना बघवली नाही. त्यांनी तातडीने सूत्रे हलविली आणि तरुणवर मुंबईतील पंचतारांकित इस्पितळात यशस्वी शस्त्रक्रिया झाली. तरुणसाठी देवदूत ठरलेल्या मुनगंटीवार यांचे आभार मानताना अंबोरे कुटुंबियांच्या डोळ्यांच्या कडा पाणावलेल्या होत्या. गोंडपिपरी येथे राहणारा तरूण साहेबराव अंबोरे (वय २२) हा मूळचा नांदेड जिल्ह्याचा रहिवासी. गेल्या १६ वर्षांपासून अंबोरे कुटुंब गोंडपिपरी येथे वास्तव्यास आहे. तरूणच्या आईवडिलांची आर्थिक परिस्थिती सुरुवातीपासूनच बेताची आहे. त्यामुळे ते भंगाराचा व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवतात. तरूणाला लहानपणापासून हृदयाचा त्रास आहे. २००६ मध्ये त्याचावर शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात आली. परंतु पुढील औषधोपचाराचा खर्च तरूणच्या आईवडिलांना पेलवत नव्हता. अशात तरुणची प्रकृती खालावत गेली व त्याच्या हृदयाचे दोन्ही व्हॉल्व निकामी झाले. २०१८ पासून त्याच्या त्रास खूप जास्त वाढला. आपल्या पोटच्या गोळ्याला तडफडताना बघून तरुणच्या आईवडिलांना काय करावे ते सूचत नव्हते. अशात त्यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य अमर बोडलावार यांच्याशी संपर्क साधला. तरुणला वाचविण्यासाठी एकच व्यक्ती मदत करू शकते आणि ती म्हणजे सुधीर मुनगंटीवार, याची पूर्ण जाणीव बोडलावार यांना होती. त्यांनी तरूणच्या आईवडिलांना तातडीने मुनगंटीवार यांच्याकडे नेले. आपली कैफियत सांगत असताना तरूणच्या आईवडिलांचा कंठ दाटून आला. मुनगंटीवार यांनी तरुणच्या पालकांच्या पाठीवर आधाराचा हात ठेवला. तरुणच्या आईवडिलांचे थरथरणारे हात हातात घेऊन आपण पूर्ण शक्तीने मदत करेन असा शब्द मुनगंटीवार यांनी दिला. आणि केवळ शब्द देऊन थांबतील ते सुधीर मुनगंटीवार कसे. त्यांनी तात्काळ आरोग्य सहाय्यक सागर खडसे यांना यासंदर्भात मदत करण्याच्या सूचना दिल्या. स्वतः जातीने लक्ष घालत सुधीर मुनगंटीवार यांनी तरुणच्या उपचारासाठी लागणारी सर्व प्रक्रिया पूर्ण करून घेतली व त्याला मुंबईला रवाना केले. अलीकडेच मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात डॉ. सुरेश जोशी यांनी तरुणच्या हृदयावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. त्यासाठी जवळपास 19 लक्ष रुपयांचा खर्च आला. शस्त्रक्रियेनंतर तरुणची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. जीवन मरणाशी संघर्ष करीत असलेल्या आपल्या लेकराला स्वस्थ पाहून त्याच्या आईवडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. पाणावलेल्या डोळ्यांनीच त्यांनी देवदुतासारखे धावून आलेल्या सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले.



# शेतकऱ्यांनी जातीच्या नव्हे; मातीच्या लढ्याला बळ द्यावे : विष्णूपंत भुतेकर

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्हयातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या गोभणी या गावातील युवा शेतकरी सतीश देशमुख हे गेल्या तीन दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. खरीप हंगामाने शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. आता रब्बी हंगाम देखील हातातून गेला आहे. त्यातच शेतपिकला बाजार समितीत कवडी मोल भाव मिळत आहे. त्याअनुषंगाने सोयाबीन व कापसाला योग्य भाव मिळावा म्हणून देशमुख यांनी अन्न आणि पाणीच्या त्याग करुन उपोषण आंदोलन सुरू केले आहे. सदर आंदोलनास भेट देवून, विष्णुपंत भुतेकर यांनी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचा पाठिंबा देत, शेतकऱ्यांनी जातीच्या नव्हे, तर मातीच्या लढ्याला बळ द्यावे असे प्रतिपादन केले आहे.

गोभणी ता.रिसोड येथिल युवा शेतकरी सतीश देशमुख हे गेल्या तीन दिवसांपासून अन्न आणि पाण्याचा त्याग करून सोयाबीन आणि कापसाच्या भावासाठी उपोषणाला बसले आहेत. प्रशासन व शासनाकडून त्यांच्या अंदोलनाची कुठलीच दखल न घेतल्यामुळे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी कार्यकर्त्यांसह उपोषण कर्त्यांची भेट घेऊन भुमीपुत्र चा पाठींबा जाहीर केला.

अदोलंन स्थळी झालेल्या सभेत बोलतांना विष्णुपंत भुतेकर यांनी उपस्थित शकडो शेतकऱ्यांना जातीसाठी, पक्षा साठी, गटासाठी न लढता शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कापुस भावा साठी तथा शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढणाऱ्या लोकांच्या पाठीसी खंबीर पणाने उभे राहले पाहीजे. भागात नव्हयान्नव टक्के शेतकरी आसुन शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती हेच आहे याची जाणीव युवा शेतकऱ्यांनी ठेवली पाहीजे. जाती जातीत लढवुन शेतकऱ्यांच्या प्रश्नाला बगल देण्याचे काम राज्यकर्त्यांकडून केले जात आहे. भूमिपुत्र कडुन सोयाबीन भावा साठी लढा उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगीतले. यावेळी त्यांच्यासोबत अमर दहीहंडे, शेषराव पाटील, मदन, बोडखे,संतोष भुतेकर, विकास आवले, शरद कोरडे यांच्यासह सह गोभणी गावातील मोठ्याप्रमाणावर कार्यकर्ते, शेतकरी व वारकरी उपस्थित होते.



# लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंती निमित्त सर्व छत्रपती संभाजीनगर मधील वंजारी बांधव व मंडळातील सर्व कार्यकारणीतील समाज बांधव उपस्थितीत होते. श्री मनोज भारस्कर यांच्या निवासस्थानी लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले तसेच आवजीनाथ बाबा व भगवान बाबा यांच्या प्रतिमेस हार पुष्प घालुन पुजा करण्यात आली. यावेळी मंडळाचे माजी अध्यक्ष श्री अरविंदजी डोणगावकर, श्री सुरेश मामा खांडरे, श्री प्रभु गोरे श्री भाऊसाहेब चोथे, श्री विवेक मुर्तडक, श्री मोहन तारगे व मंडळाचे अध्यक्ष श्री मनोज भारस्कर, उपाध्यक्ष श्री दुष्यंत मुळे, सचिव श्री सुनील धात्रक व समाज बांधव उपस्थित होता. मंडळाचे माजी अध्यक्ष श्री अरविंदजी डोणगावकर यांनी मुंडे साहेबांचे विचार व आठवणींना उजाळा दिला.



# वर्धा जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी २७ कोटी

## वर्धा येथे सौरऊर्जेवरील फ्लड लाईट टॉवरचे सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**वर्धा :** खेळाडूंना रात्री देखील सराव करता यावा, यासाठी जिल्हा क्रीडा संकूल वर्धा येथे १ कोटी २४ लक्ष रुपये खर्च करून सौरऊर्जेवर चालणारे फ्लड लाईट टॉवर बसविण्यात आले आहे. या टॉवरचे उद्घाटन वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी क्रीडा मंत्री संजय बनसोडे होते. तर खासदार रामदास तडस, आमदार डॉ. पंकज भोयर, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलिस अधीक्षक नूरूल हसन, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, जिल्हा नियोजन समिती सदस्य सुनील गफाट, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड यांची प्रमुख उपस्थिती होती. खेळाडूंना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण असल्याचे ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले. 'वर्धा जिल्ह्यासाठी आपण 'मिशन ऑलम्पिक २०३६' डोळ्यापुढे ठेवले आहे. जिल्ह्याला ऑलिम्पिक पदक प्राप्त करून देण्याचा आपला संकल्प आहे. या संकल्पाला फ्लड लाईटच्या रुपाने प्रकाशाचा आशीर्वाद लाभला आहे. आता रात्री देखील खेळाडूंना चांगला सराव करता येईल,' असे ते म्हणाले. जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी निधी मंजूर झाल्याची माहिती क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी दिली. 'वर्धा जिल्ह्याच्या क्रीडा विकासासाठी निधी मिळावा अशी मागणी आमदार डॉ.पंकज भोयर यांनी केली होती. वर्धा येथे येताना निधी मंजुरीचा आदेश घेऊन येतो, असे मी म्हणालो होतो. त्याप्रमाणे जिल्ह्यासाठी 27 कोटी रुपयांच्या विविध क्रीडा विषयक कामांना प्रशासकीय मंजुरीचा आदेश घेऊन आलो आहे. जिल्ह्याला आणखी निधी पाहिजे असल्यास उपलब्ध करून देऊ,' अशी ग्वाही क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी दिली. त्याचवेळी मंजुरीचा आदेशही त्यांनी आमदार डॉ. पंकज भोयर यांना सुपूर्द केला. आमदार डॉ. भोयर कृतज्ञता व्यक्त करताना म्हणाले, 'फ्लड लाईटमुळे जिल्ह्यातील खेळाडूंना सरावासाठी चांगली सुविधा निर्माण झाली आहे. जिल्ह्याच्या क्रीडा सुविधांसाठी क्रीडामंत्र्यांकडे २५ कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यापेक्षा जास्त २७ कोटी रुपये त्यांनी मंजूर केले. प्रशासकीय मान्यता देखील उपलब्ध करून दिली. त्यामुळे पालकमंत्री आणि क्रीडा मंत्र्यांचे आभार मानले. तत्पूर्वी, पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार तसेच क्रीडा मंत्री श्री.बनसोडे यांनी फित कापून टॉवरचे उद्घाटन केले. त्यानंतर पालकमंत्री यांच्या हस्ते टॉवरची कळ दाबून फ्लडलाईट प्रकाशित करण्यात आले. क्रीडा संकुलाच्या चारही बाजूंना चार टॉवर उभारण्यात आल्याने रात्री देखील खेळाडूंना सराव करता येणार आहे.

# आंबेडकरी चळवळीत भैय्यासाहेब आंबेडकरांचे महत्त्वाचे योगदान : ढवळे

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** भारतीय बौद्ध महासभा, नवबौद्धांचे आरक्षण, धम्मदीक्षेचे कार्यक्रम, सामाजिक, सांस्कृतिक, वृत्तपत्रीय तसेच राजकीय क्षेत्रात भैय्यासाहेब आंबेडकरांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही धम्मप्रसाराचे काम केले आहे. सामाजिक अन्याय अत्याचार प्रसंगी समाजाच्या मदतीला धावून गेले. आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीत भैय्यासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन येथील साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांनी केले. भैय्यासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ते बोलत होते. यावेळी माजी सरपंच कैलास गोडबोले, पुरभाजी गोडबोले, माधवदादा गोडबोले, श्रीरंग गच्चे, सुरेश गोडबोले, समता सैनिक दलाचे आनंद गोडबोले, गुणवंत गच्चे, रवी गच्चे, किशन गच्चे, उत्तम गोडबोले, राजेश गच्चे, इलू गोडबोले, ढगे तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या ग्रामशाखा महिला पदाधिकारी, बौद्ध उपासक, उपासिका, बालक बालिका यांची उपस्थिती होती. सूर्यपूत्र भैय्यासाहेब आंबेडकर ऊर्फ यशवंत आंबेडकर यांच्या १११ व्या जयंतीनिमित्त जवळा देशमुख येथील विश्वशांती बुद्ध विहारात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प, धूप आणि पुष्प पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर साहित्यिक प्रज्ञाधर ढवळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी समता सैनिक दलाने मानवंदना दिली. यानंतर सुरज गोडबोले संचलित त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले. त्यानंतर प्रज्ञाधर ढवळे यांनी उपस्थित बौद्ध उपासक उपासिकांना संबोधित केले.

# अखेर कामगार लढायला मिळाले यश

## साखर कारखाना कामगारांची दिवाळी गोड

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** सहकारी साखर कारखाना सन २००९ साली बंद झाला. त्यावेळी कामगारांची कारखान्याकडे सुमारे 38 महिन्याचा पगार, ग्रॅच्युईटी, प्रॉडक्ट फंड व इतर येणे बाकी होती. जी त्यांना न मिळाल्यामुळे कामगारांनी सण 2010 मध्ये मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका क्रमांक 64 22 / 2010 दाखल केली. संबंधित याचिका दि. 20 .6 .2012 रोजी निकाली निघाली. त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने निर्णय देताना राज्य सहकारी बँकेला सूचित केले की, कारखाना विक्री करून जी 50 कोटी 20 लक्ष रक्कम बँकेकडे जमा झालेली आहे, ती नोलीन अकाउंटमध्ये जमा करावी व त्यातून कर्मचाऱ्यांची सर्व देणी द्यावीत, तसेच कर्मचाऱ्यांनाही सूचना दिली की, आपण आपला पगार सक्षम अधिकाऱ्यामार्फत सक्षम न्यायालयाकडून प्रमाणित करून तो राज्य सहकारी बँकेकडे सादर करावा. .सदर याचिका ही केवळ 84 कामगारांच्या वतीने दाखल करण्यात आली होती... म्हणून उर्वरित 835 कामगारांनी नव्याने पुन्हा मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका क्रमांक 14 24 / 20 12 दाखल केली ,ज्यामध्ये दिनांक :19. नोव्हेंबर 2014... रोजी मा. न्यायालयाने वरील निर्णय कायम केला. दरम्यान महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मा. उच्च न्यायालय ,खंडपीठ, औरंगाबादचे सन 2012 चे निर्णयाचे नाराजीने सर्वोच्च न्यायालय ,दिल्ली येथे गेली. परंतु, त्यांना सदर न्यायालयाने खालच्या निर्णयाविरुद्ध कोणतीही स्थगिती दिली नाही. सदर याचिका केवळ कामगारांच्या पगाराविरुद्ध प्रलंबित आहे.

दरम्यानचे कालावधीत कामगारांना त्यांची प्रॉव्हिडंट फंडा पोटी थकीत असलेली रक्कम रुपये सुमारे 12 कोटी न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे यापूर्वीच प्राप्त झाले असून माननीय न्यायालयाचे निर्णयाप्रमाणे कामगारांनी आपले पगाराची व ग्रॅज्युटीची रक्कम प्रमाणित करून सक्षम न्यायालय मार्फत ती राज्य सहकारी बँकेकडे पाठवली, ग्रॅज्युएटीची रक्कम मिळावी म्हणून कामगारांनी पाठपुरावा केल्यानंतरही राज्य सहकारी बँक दाद देत नसल्यामुळे कामगारांनी मा. उच्च न्यायालय ,खंडपीठ ,औरंगाबाद येथे सदर बँके विरुद्ध अवमान याचिका क्रमांकः 421 / 2021 दिनांक 27. 10. 20 21 रोजी दाखल केली ,दोन वर्षाच्या संघर्षानंतर दिनांक 27 .10. 2023 रोजी सदर याचिकेमध्ये अंतरिम निर्णय झाला ,मा. न्यायालयाने राज्य सहकारी बँकेस तातडीने दीपावली पूर्वी मा. न्यायालयात 16 कोटी 12 लक्ष रुपये भरणे बाबत आदेशित केले. त्याप्रमाणे सदर बॅंकेने सदरची रक्कम तातडीने बँकेत जमा केली व दिवाळीपूर्वीच आवश्यक त्या कागदपत्रांची जमवा जमवी करून मा. उच्च न्यायालयाचे वतीने कामगारांचे बँक खात्यावर आरटीजीएस प्रणाली नुरूप वर्ग करण्यात आली, ज्यामुळे एक प्रदीर्घ लढाईत कामगारांना अंशतः यश प्राप्त झाले ,ज्यामुळे कामगारांची दिवाळी गोड झाली, सबब कामगारांनी दिनांक 16.12.2023.. शनिवारी, सकाळी 11.00 वाजता राजुरेश्वर मंगल कार्यालय कारखाना परिसर, कन्नड,येथे आनंद उत्सव साजरा करण्याचे ठरवून स्नेहभोजनाचेही आयोजन केलेले आहे... कामगारांचे वतीने सदर न्यायालयात न्यायालयीन लढाई ही एड्. सतीश तळेकर, एड्. प्रज्ञा तळेकर यांनी समर्थपणे लढविली. कामगाराच्या या लढाईत स्व. चिंतामण मोरे, समाजसेविका मेधाताई पाटकर, कॉ. माणिकराव जाधव यांचे मोलाचे सहकार्य वेळोवेळी प्राप्त झाले.

शनिवारी होणाऱ्या आनंद उत्सव कार्यक्रमात ॲड. कृष्णा जाधव, उत्तमराव राठोड, कामगार सचिव लाल मिया शहा, वर्धमान पाटणी , कृष्णा मोहिते, टी. एस .चव्हाण, आर. व्ही. शिंदे इत्यादी मार्गदर्शन करणार आहेत.



# शरद पवार समाजहित जपणारे जाणते नेते : प्राचार्य चंद्रकांत जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** येथील रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषिमंत्री पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या ८३ व्या वाढदिवसानिमित्त विशेष व्याख्यान व अभिष्टचिंतन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मालोजीराजे विद्यालय व जुनिअर कॉलेज लोणंदचे प्राचार्य चंद्रकांत जाधव यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करताना शरद पवार यांच्या कार्यावर विशेष प्रकाश झोत टाकला. शरद पवार समाजहित जपणारे जाणते नेते आहेत. असे प्राचार्य चंद्रकांत जाधव यांनी म्हटले.ते म्हणाले की,भारतीय राजकारणातील एक मुत्सद्दी व्यक्तिमत्व म्हणून शरदचंद्रजी पवार यांच्याकडे पहावे लागते.आज ते जगामध्ये सगळ्यांना सुपरचित आहेत. ते फक्त त्यांच्या कार्य कर्तृत्वामुळे.ते एक नुसते राजकारणी नसून समाजहित जपणारे जाणते नेते आहेत. त्यांनी सहकार, कला, क्रीडा आणि कृषी क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केल्यामुळे आज महाराष्ट्र प्रगतीपथावर असलेला पाहायला मिळतो. आजच्या तरुणांनी सदसद विवेक बुद्धी वापरून त्यांचे व्यक्तिमत्व राजकारणा पलीकडे जाऊन समजून घेऊन त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. रयत शिक्षण संस्थेची शिक्षणाची उंची वाढविण्यामध्ये साहेबांचे मोलाचे योगदान आहे.योग्य माणूस ओळखण्याचे कौशल्य त्यांच्यामध्ये आहे. धर्म आणि जात याच्या पलीकडे जाऊन काम करणारे नेतृत्व शरदचंद्र पवार आहेत.असे सुद्धा प्राचार्य चंद्रकांत जाधव यांनी म्हटले आहे. यावेळी कार्यक्रम प्रसंगी प्र.प्राचार्य, उपप्राचार्य, प्रा.शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. मराठी विभाग व इंग्रजी विभाग यांच्या वतीने अक्षरबन या भित्तिपत्रिकेचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयामध्ये ११ डिसेंबर रोजी वक्तृत्व स्पर्धेचे सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शरदचंद्र पवार यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू मांडण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# उर्ध्व मानार लिंबोटी प्रकल्पातील २५ दलघमी पाणी पिण्यासाठी आरक्षित करा : आ. शामसुंदर शिंदे

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** उर्ध्व मानार प्रकल्पावरील कालवा समितीची बैठक काल दि. १२ डिसेंबर रोज मंगळवारी लोहा तहसील कार्यालयात लोहा कंधार मतदारसंघाचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार शामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे, तहसीलदार शंकर लाड, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक चंद्रसेन पाटील, खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पवार, कालवा सल्लागार समितीचे सदस्य सचिव तथा सहाय्यक अभियंता एस.एन. फुलारी, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता आशिष चौगुले, शाखा विभागाचे अक्षय राजपूत, सिंचन शाखाधिकारी बालाजी रानवळकर, लातूर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र काळे या बैठकीस प्रमुख उपस्थित होते. यावेळी या बैठकीत आमदार शामसुंदर शिंदे यांनी उर्ध्व मानार प्रकल्पातील उपलब्ध पाण्याविषयी पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा करून यावर्षी पाऊस अत्यंत कमी झाल्यामुळे उर्ध्व मानार लिंबोटी प्रकल्पासह इतर धरणात व तलावात अत्यंत कमी पाणीसाठा उपलब्ध असल्याने यापुढील काळात उर्ध्व मानार लिंबोटी धरणाच्या प्रकल्पातून यापुढे लिंबोटी धरणाच्या प्रकल्पातून कालव्याद्वारे पाणीपुरवठा न करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला व लिंबोटी धरण प्रकल्पात सध्या उपलब्ध असलेला २५ दलघमी पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करण्याचे निर्देश यावेळी आमदार शामसुंदर शिंदे यांनी बैठकीतील उपस्थित पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले, यावेळी पाटबंधारे विभागाच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लिंबोटी प्रकल्पातील उपलब्ध २५ दलघमी पाणी पिण्यासाठी आरक्षित केले जाणार असल्याचे आमदार शामसुंदर शिंदे यांना सांगितले. यावेळी शेकापचे तालुका अध्यक्ष नागेश पाटील हिलाल सह संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते.

## नरेंद्र मोदी विचारमंच बीड जिल्हाध्यक्षपदी सुनील सिरसाट

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** भारतीय जनता पार्टीचे आणि हिंदुत्ववादी विचाराचे कट्टर कार्यकर्ते म्हणून संपूर्ण मराठवाड्यात परिचित असणाऱ्या सुनिल सिरसाट यांची नुकतीच देश-विदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार पोहोचण्याकरता स्थापित केलेल्या नरेंद्र मोदी विचार मंचाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आंबेजोगाई येथील असलेले सर्वांच्या परिचयाचे आणि समाजात लोकप्रिय सामाजिक-राजकीय कार्यकर्ते म्हणूनही आणि एक निर्भीड पत्रकार, रोखठोक व्यक्तीमत्व म्हणून ज्यांची बीड जिल्ह्यासह संबंध मराठवाड्यात एक वेगळी ओळख आहे. ते गेल्या 28-30 वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचे आणि स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांचे एकनिष्ठ कट्टर कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. शिवाय विद्यमान कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे मुंडे हे भाजपावाशी असतानाचे अत्यंत विश्वासू व निकटवर्तीय कार्यकर्ते म्हणून जिल्हाभरात परिचित होते. सध्याला त्यांच्याकडे भाजपाच्या पंचायतराज व ग्रामविकास समितीच्या मराठवाडा विभागाच्या सह-संयोजक पदाची आणि अखंड हिंदूराष्ट्र संघटनेच्या महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षपदाची तिसऱ्यांदा जबाबदारी असतानाही पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकून नव्याने नरेंद्र मोदी विचारमंचाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरातील हिंदू संघटना, बजरंग दल, अभाविप, विश्व हिंदू परिषद, व्यापारी, कार्यकर्ते, इतर विविध संघटना, भाजप-दोन्ही शिवसेने सह ईतर पक्षातील पुढारी-पदाधिकारी, नगरसेवक, पत्रकार बांधव, वकील संघासह मित्र परिवाराकडून स्वागत-अभिनंदन केले जात असून पुढील वाटचालीसाठी मोठ्या प्रमाणात शुभेच्छाही दिल्या जात आहेत.

## ओम, सोहम खंडेलवालने फुटबॉलस्पर्धेत पटकावले सुवर्णपदक

आधुनिक केसरी न्यूज





**छत्रपती संभाजीनगर :** नेपाळ (पोखरा) येथील रंगशाला स्टेडियमवर नाईन साईड दक्षिण एशियाई फुटबॉल स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत भारतीय फुटबॉल सब ज्युनिअर संघाने सुवर्णपदक पटकावले.

भारतीय सब ज्युनिअर मुलांच्या संघाने नेपाळ व भूतान संघाला पराभूत करून भारतीय संघाला सुवर्णपदक प्राप्त करून दिले. युनिव्हर्सल शाळेचा सोहम खंडेलवाल हा भारतीय संघाचा उपकर्णधार होता तर ओम खंडेलवाल याने उत्कृष्टपणे गोल करून भारतीय संघाच्या विजयात मोलाचा सहभाग नोंदवला. ओम आणि सोहम यांनी आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत जे दणदणीत यश मिळवले त्यांच्या या यशात भारतीय संघाचे प्रशिक्षक डी.आर खैरनार (महाराष्ट्र) यांचे त्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. सब ज्युनिअर संघाने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल नाईन साईड फुटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव श्री प्रवीण सांगते, सहसचिव व शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त प्राध्यापक एकनाथ साळुंखे, श्री सतीश पवार यांनी ओम आणि सोहम चे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत मिळवलेल्या नेत्र दीपक यशाबद्दल युनिव्हर्सल शाळेच्या प्राचार्या श्रीमती सीमा गुप्ता व शाळेचे फुटबॉल प्रशिक्षक श्री राहुल बनसोडे, शाळेच्या सर्व कर्मचाऱ्यासह, युनिव्हर्सल शाळेच्या विद्यार्थ्यांकडून, पालकाकडून व समाजातील विविध स्तरातून ओम आणि सोहम यांच्यावर शुभेच्छांचा व अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## जालन्याचे 'बिग बॉस' राज्य नाट्यस्पर्धेत तृतीय

### सुमीत शर्मा व रेखा चव्हाण यांना अभिनयाची पारितोषिके

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** नाट्यांकुर व उत्कर्ष थिएटर निर्मित 'बिग बॉस' या दोन अंकी नाटकाने 62व्या राज्य नाट्य स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला असून यातील कलावंत सुमीत शर्मा व रेखा चव्हाण यांना उत्कृष्ट अभिनयाची गुणवत्ता प्रमाणपत्रे घोषित झाली आहेत.

सतीश लिंगडे लिखित व सुमीत शर्मा दिग्दर्शित या नाटकाचा प्रयोग 22 नोव्हेंबर रोजी तापडिया रंगमंदिर, छत्रपती संभाजीनगर केंद्रावर सादर झाला. यात लेखक, दिग्दर्शकासह रेखा चव्हाण, तेजस्विनी वाघमारे, विनोद जैतमहाल व चंचल पंचवटकर यांनी मुख्य भूमिका साकारल्या. तर संगीत गणेश लोखंडे, प्रकाशयोजना पवनकुमार खांदे, नेपथ्य राहुल काळे, सतीश लिंगडे, रंगभूषा संध्या शर्मा, वेशभूषा वर्षाराणी कोळवले, प्रेरणा सराफ कुलकर्णी, रंगमंच व्यवस्था अथांग लिंगडे, सुनील गव्हाणे, सोहम भुरेवाल यांची होती. जालना शहरात रंगकर्मींना तालमीसाठी कुठल्याही सुविधा नसताना व्यावसायिक दर्जाचे नाटक येथे उभे केले जाते आणि स्पर्धेत हे नाटक बक्षिसेही मिळवते ही बाब कौतुकास्पद आहे. या नाटकाच्या निर्मितीदरम्यान जालना कामगार कल्याण केंद्राने केलेल्या अमूल्य सहकार्याचाही मोठा वाटा आहे.



**कुटुंबातील संवादाची गोष्ट :** मोबाइल, सोशल मीडिया आणि प्रगती करण्याच्या आंधळ्या स्पर्धेपायी कुटुंबातील संवाद कसा हरवला आहे त्याची दाहकता 'बिग बॉस' या नाटकातून मांडली आहे. नात्यांमध्ये कोरडेपणा आणि यांत्रिकपणा वाढत गेला तर माणूसपणच संपेल या भीतीने एका कुटुंबातील गृहिणी काय उपाय करते आणि अख्खे कुटुंब पुन्हा कसे सावरते याचे अतिशय रंजक नाट्य लेखक सतीश लिंगडे यांनी साकारले आहे.

**व्यावसायिक दर्जाचे नाटक :** कलावंतांच्या उत्कृष्ट अभिनयासह या नाटकाची तांत्रिक बाजूही भक्कम आहे. बॉक्स सेटचे अतिशय देखणे नेपथ्य, प्रकाशयोजनेतील अचूकता व संगीताच्या योग्य वापरासह रंगभूषा व वेशभूषेचाही विशेष विचार करण्यात आला आहे. या सर्वांच्या सांघिक परिणामामुळे हे नाटक व्यावसायिक करावे अशा प्रतिक्रिया अनेक प्रेक्षकांनी व्यक्त केल्या.

## मराठा आरक्षणाला पाठिंबा, घरकुल, विहीर, गोठा, रेशनिंग, पोषण आहारावर चर्चा व ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामसभेचे दि.१२रोजी आयोजन करण्यात आले होते अध्यक्षस्थानी सरपंच आप्पाराव पाटील नलावडे हे होते. ग्रामसभेत प्रथमतः ग्रामविकास अधिकारी एबी बनसोड यांनी ग्रामसभेतील विषयांचे वाचन करुन नागरिकांकडून त्यांच्यावर चर्चा करून ठराव संमत करण्यात आले. वर्ष -२०२४-२५ वित्तीय वर्षांचे अंदाज पत्रक,जीपीडीपी कृती आराखडा, एमआरइजीएस चा आराखडा, विविध विकास योजनेअंतर्गत कामांसाठी आराखडा यावर नागरिकांसी चर्चा करुन विचार विनमय करत ठराव संमत करण्यात आले. आलेल्या अर्जातून रेशन दुकानदारा विरूद्ध तक्रारी,शालेय पोषण आहार संदर्भात तक्रारी, धांड नदीलगतच्या रस्ता तक्रारी, दारु वाईन परमिट ठराव, लग्नाळु मुला संदर्भात मुली साठीचे विचार व मराठा आरक्षण संदर्भात सभेत एकमताने पाठिंबा देण्यात आला तर गैरहजर शासकीय कर्मचारी यांच्या विरोधात वरिष्ठांकडे तक्रार ठराव करण्यात आला.ग्रामसभेत विविध विषयांवर चर्चा विचार विनिमय करून खेळीमेळीच्या वातावरणांत सभा संपन्न झाली. उपसरपंच कारभारी नलावडे, सदस्य पोपट काटकर, अरुण गायकवाड, माजी सरपंच भिमराव नलावडे, जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा नलावडे, माजी ग्रापंसदस्य चांद पठाण, युवराज नलावडे, अशोक नलावडे,खंडु पाटील, पंडित राव नलावडे, नारायण नलावडे, सुपडू नलावडे, सखाहरी महाराज, उत्तम नलावडे,जयदिप नलावडे, भरत नलावडे, जाधव, सुधाकर धुमाळ, लड्डू सय्यद, संजय चंदनसे, गीरी, सुधाकर नलावडे, बंडु नलावडे, शुभम चव्हाण, दगु सोनवणे, सुधाकर औटे, तलाठी,कृषि सहाय्यक हींगे, वनरक्षक, पोलिस, मुख्याध्यापक हरिभाऊ दहीफळे, मगर सर ग्रामस्थ नागरिक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# चंद्रपुरात १७ डिसेंबरला होणार ओबीसी बचाव परिषद

## ओबीसी नेते डॉ. अशोक जिवतोडे यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मराठ्यांना स्वतंत्र आरक्षण द्या, मात्र ओबीसी आरक्षणाला धक्का लागू देऊ नका, मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा या व अशा विविध मागण्या घेऊन चंद्रपूरात येत्या 17 डिसेंबर ओबीसी बचाव परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या परिषदेत महाराष्ट्रातील ओबीसी समाजातील विविध जात समुदायातील प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. अशी माहीती विदर्भातील ओबीसी नेते डॉ. अशोक जिवतोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्थानिक जनता महाविद्यालय परिसरात आयोजित या पत्रकार परिषदेला मान्यवर उपस्थित होते. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांची आरक्षणा बाबतची भुमिका वारंवार बदलत असून मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या व ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण द्या ही जरांगे यांची भुमिका ओबीसी समाजाचे नुकसान करणारी आहे. यातून ते समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत असून त्यांचे वक्तृत्व हे समाजा समाजात द्वेष व विरोध पसरविणारे असल्याचे मत या पत्रकार परिषदेस देण्यात आलेल्या पत्रकात व्यक्त करण्यात आले आहे.

या ओबीसी बचाव परिषदेत सद्य परिस्थितीवर विचार विनिमय व मंथन करण्यात येणार असून त्यानुसार ओबीसी समाजातील सर्व जातसंघटनेच्या चर्चेअंती संमत होणारे ठराव राज्य सरकार व केंद्र सरकार ला हिवाळी अधिवेशनात देण्यात येणार आहेत. या परिषदेच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सरकारशी संबंधीत ओबीसी समाजाच्या प्रमुख विषयांवर खालील प्रमाणे चर्चा करण्यात येणार आहे.

# शशिकांत कुलथे यांची बालभारतीच्या मराठी विषय समिती सदस्यपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारती पुणे हे महाराष्ट्रातील राज्य शासनाच्या पाठ्यक्रमाची पुस्तके निर्मिती करण्याचे काम करते. अशा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारतीच्या पायाभूत म्हणजेच बाल वाटिका ते पाचवी वर्गाच्या मराठी विषय समिती सदस्यपदी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दामुनाईक तांडा शाळेचे राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे यांची निवड करण्यात आलेली आहे.
शशिकांत कुलथे हे बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दामूनाईक तांडा या ठिकाणी सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांची शैक्षणिक पात्रता एम ए इंग्रजी, विषय संप्रेषण आणि संगीत असून शिक्षणशास्त्र या विषयात त्यांनी एम एड पूर्ण केलेले आहे. याबरोबरच संगीत पारंगत, संगीत विशारद गायन आणि तबला या विषयात त्यांनी पूर्ण केलेले आहे. उर्दू पदविकेसोबतच गोरमाटी बोलीभाषेचाही त्यांनी अभ्यास केलेला आहे. आज पर्यंत त्यांनी राज्य व जिल्हा दैनिकातून सुमारे १००० हून अधिक विषयांवर स्तंभलेखन केलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोशामध्ये देखील त्यांच्या अठराहून अधिक नोंदी समाविष्ट करण्यात आलेले आहेत. आजपर्यंत त्यांची विविध विषयावर सहा पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. तसेच विविध पुस्तकांचे संपादनही त्यांनी केलेले आहे. त्यांच्या वैविध्यपूर्ण शैक्षणिक, सामाजिक, सांगितीक कार्याबद्दल भारत सरकारचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार सन २०२२ मध्ये त्यांना प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच राज्य शासनातर्फे सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीताचा प्रथम पुरस्कारही त्यांना प्रदान करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ बालभारती या संस्थेमार्फत राज्यातील पहिली ते बारावीच्या सर्व माध्यमांच्या व विषयांच्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे काम करण्यात येते. राज्याच्या तसेच देशाच्या विकासामध्ये व जडणघडणीमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करताना पाठ्यपुस्तके महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सक्षम नागरिक तयार करणे ही पाठ्यपुस्तकांची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यामध्ये विविध विषयातील अध्यक्ष आणि सदस्यांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. यामध्ये विषयाचा अभ्यासक्रम, त्याचा तपशील, पाठ्यपुस्तकासंबंधीचा आराखडा, त्यांचे विकसन अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होतो. अशा या कार्यक्रमांमध्ये बालभारतीचे विषय समिती अध्यक्ष आणि सर्व समिती सदस्य यांचे काम महत्त्वपूर्ण ठरते.

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे यांचे या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# विवेकानंद इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथील विवेकानंद सेवा केंद्र संचलित विवेकानंद इंग्लिश स्कुल परतूर येथे वार्षिक स्नेहसंमेलन 2023 उत्साहात साजरे करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर, संदीप दादा बाहेकर, मुख्याध्यापिका संगीता शिंदे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संभाजी अप्पा वारे, सुबोध भैया चव्हाण, आबासाहेब वरखडे, विश्वंभर बहिवाल, प्राचार्य भिसे सर, शाम तेलगड, राजेंद्रप्रसाद पोरवाल, विक्रम नाना माने, अरुण रेपे, सौ. स्मिता रोडगे, सौ. सपना लाळे, विठ्ठल आघाव, पवनकुमार कासट, मधुकर पंडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक वारसा जपत यावर्षी संपूर्ण स्वतंत्रता संग्राम यात स्वातंत्र्यवीर सावरकर, भगत सिंग, मंगल पांडे, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, झाशी ची राणी लक्ष्मीबाई यांच्यावर आधारित नृत्यनाटिकेतून संपूर्ण स्वतंत्रता संग्रामाचे सादरीकरण करण्यात आले. त्याबरोबर बॉलिवूड मधील थोर कलाकारांचे दादासाहेब फाळके, दादा कोंडके, अशोक सराफ, अमिताभ बच्चन, श्रीदेवी, मिथुन चक्रवर्ती इतर कलाकारांच्या गीतांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे प्राचार्य भालचंद्र महाजन, डॉ विश्वनाथ वाघमारे, तांत्रिक सहाय्यक विजयकुमार दंदाले व सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



# मराठा समाजाकडून मयत बालाजी जाधव यांच्या कुटुंबीयास सात लाखांची मदत

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** आरक्षण लढ्यातील प्रमुख योद्धे मनोज पाटील जरांगे यांच्या सभेची तयारी करण्यासाठी कंधारकडे जात असलेल्या चोंडी ता. लोहा येथील बालाजी जाधव यांचा मोटारसायकलच्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यांच्या पश्चात जाधव कुटुंबीयांना दि. १२ डिसेंबर रोजी लोहा व कंधार तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने ६ लाख ७५ हजार रुपये आर्थिक मदत दिली.
मराठा आरक्षण लढ्यातील प्रमुख मनोज पाटील यांची कंधार येथे दि. ८ डिसेंबर रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेच्या नियोजनाच्या तयारी साठी लोहा तालुक्यातील चोंडी येथील मराठा स्वयंसेवक बालाजी जाधव हे दुचाकीने कंधार येथील सभास्थळाकडे जात असताना घोडज नजिक मोटारसायकल अपघातात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. सभा आटोपल्यानंतर जरांगे यांनी चोंडी येथे जाऊन जाधव कुटुंबीयांची संत्वन भेट घेवून त्यांना धीर देत लोहा व कंधार तालुक्यातील सकल मराठा समाजाला उद्देशून जाधव कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याचे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देत दोन्ही तालुक्यातील मराठा समाज बांधवांनी निधी संकलन करून मयत जाधव कुटुंबीयास ६ लाख ७५ हजार रुपयांचा निधी मदत म्हणून देण्यात आला.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर